सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. १९ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३५२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विधान परिषदेत उरली महायुतीच्या विजयाची औपचारिकता

मुंबई : विधान परिषदेच्या पाच रिक्त जागांसाठीच्या निवडणुकीतील महायुतीच्या विजयाची औपचारिक घोषणा २० तारखेला अर्ज मागे घेण्याची मुदत संपताच केली जाईल. ही निवडणूक बिनविरोध झाली आहे. निवडणुकीसाठी महायुतीच्या पाच उमेदवारांच्या व्यतिरिक्त फक्त एका अपक्ष उमेदवाराने अर्ज भरला होता. महाविकास आघाडीकडून एकाही उमेदवाराने अर्ज भरला नव्हता. छाननीवेळी नियमानुसार आमदारांच्या पाठिंब्याचे पत्र आणि नोटरी नसल्याने अपक्ष उमेदवाराचा अर्ज बाद करण्यात आला आहे. आता निवडणूक रिंगणात पाच रिक्त जागांसाठीचे महायुतीच्या पाच उमेदवारांचे अर्जच शिल्लक आहेत. यामुळे निवडणूक बिनविरोध झाली आहे. उमेदवारांच्या विजयाची औपचारिक घोषणा २० मार्च रोजी अर्ज मागे घेण्याची मुदत संपताच केली जाईल.

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी महायुतीचे पाच उमेदवार

संदीप जोशी, संजय केणेकर आणि दादाराव केचे – भाजपा

चंद्रकांत रघुवंशी – शिवसेना, संजय खोडके – राष्ट्रवादी काँग्रेस

राज्याच्या विधान परिषदेतील पाच आमदारांनी विधानसभेची निवडणूक लढवली आणि जिंकली. यानंतर विधानसभेचे आमदार झालेल्या पाच जणांनी विधान परिषदेतील सदस्यत्वाचा राजीनामा दिला. यामुळे विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त झाल्या आहेत. याच जागांसाठी निवडणूक होणार आहे. आमश्या पाडवी, प्रविण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे पाच विधान परिषदेचे सदस्य आता विधानसभेचे आमदार झाले आहेत. या पाच जणांच्या रिक्त जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. विधान परिषदेच्या पाच रिक्त झालेल्या जागांसाठी मार्च महिन्यात निवडणूक घेण्याचा निर्णय झाला. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. या कार्यक्रमानुसार निवडणुकीसाठी १७ मार्च पर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार होते. अर्जांची छाननी १८ मार्च रोजी झाली. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २० मार्च पर्यंत असेल.

## शांतता व संयम पाळत धार्मिक सण साजरे करावेत : मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई : महाराष्ट्र हे 'प्रगतिशील राज्य' असून या ठिकाणी जातीभेदाला थारा नाही. नागपूर शहरांमध्ये १७ मार्च रोजी राज्याची सामाजिक घडी विस्कटणारी घटना घडली. या घटनेमुळे राज्याच्या शांततेला धक्का बसला. सध्या सर्वधर्मीयांचे सण सुरू आहेत. नागरिकांनी संयम बाळगून शांतता राखत हे सण साजरे करावेत, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत नागपूर घटनेवर आधारित निवेदनाद्वारे केले.

नागपूर येथील प्रकरणात पोलीस शांतता प्रस्थापित करण्यासाठी गेले होते. त्यांच्यावरही जमावाने हल्ला केला. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था हातात घेणाऱ्या आणि पोलिसांना मारहाण करणाऱ्या कुणालाही सोडले जाणार नाही. त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्री फडणवीस यांनी इशाराही दिला.



मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागपूर शहरात १७ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता महाल परिसरात औरंगजेबाची कबर हटविण्याच्या मागणीसाठी काही संघटनांनी गवताच्या पेंड्यांची प्रतीकात्मक कबर काढून आंदोलन केले. याबाबत गणेश पेठ पोलिसांनी गुन्हे दाखल केले. मात्र या आंदोलनाबाबत अफवा पसरली व काही समाज घटकांनी हंसापुरी भागात जमाव करीत हिंसक आंदोलन केले. या भागात १२ दुचाकी जाळण्यात आल्या. तसेच भालदापूर भागात दोन जेसीबी, क्रेन आणि चारचाकी वाहनांची जाळपोळ करण्यात आली. येथे दगडफेकही करण्यात आली. या संपूर्ण घटनांमध्ये ३३ पोलीस जखमी झाले असून पाच नागरिक जखमी झाले आहेत. यापैकी तीन नागरिकांना उपचाराअंती सोडण्यात आले, तर दोन नागरिकांवर उपचार सुरू आहेत. तसेच पोलिस उपायुक्त दर्जाचे तीन अधिकारीही जखमी झाले आहेत. यामध्ये एका अधिकाऱ्यावर कुऱ्हाडीने मारहाण झाल्याचे दिसून येत आहे.

जमावाला शांत करण्यासाठी पोलिसांना अश्रुधुरांचा वापर करावा लागला. तसेच सौम्य बळाचा वापर करीत शांतता प्रस्थापित करावी लागली. याप्रकरणी गणेशपेठ पोलीस ठाण्यात तीन गुन्हे दाखल करण्यात आले असून तहसील पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नागपूर शहरातील ११ पोलीस ठाणे अंतर्गत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या पाच तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच या भागात प्रवेश स्तरावर तपासणी नाके उभारण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

घटनास्थळावरून ट्रॉली भरून दगड मिळाले आहेत. घरांवर दगड जमवून ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले असून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. हा हल्ला सुनियोजित पॅटर्न असल्याचे दिसून येते. राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

नागरिकांनी एकमेकांचा आदरभाव करीत आपले सण साजरे करावे. शांतता राखावी, कायदा व व्यवस्था टिकवण्यासाठी शासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करीत दंगा करणाऱ्यांबाबत कुठल्याही जाती धर्माचा विचार न करता कडक कारवाईच्या इशाऱ्याचा पुनरुच्चारही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केला.

## 'मतदार ओळखपत्र' आणि आधार कार्ड लिंक होणार

नवी दिल्ली : मतदार ओळखपत्र लवकरच आधार कार्डाशी लिंक केले जाणार आहे. याबाबत केंद्रीय गृहमंत्री आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे मतदार यादी अधिक पारदर्शक आणि अचूक होईल, तसेच बनावट मतदार ओळखणे सोपे होणार आहे. निवडणूक प्रक्रियेत अधिक विश्वासार्हता आणण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंह संधू आणि डॉ. विवेक जोशी यांनी नवी दिल्लीतील निर्वाचन सदन येथे एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, विधी विभागाचे सचिव, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव, यूआयडीएआयचे सीईओ आणि निवडणूक आयोगाचे तांत्रिक तज्ज्ञ उपस्थित होते.

बैठकीत ठरल्यानुसार मतदार ओळखपत्र आधार कार्डशी जोडण्याची प्रक्रिया संविधानाच्या अनुच्छेद ३२६ च्या तरतुदींनुसार होईल. यूआयडीएआय आणि निवडणूक आयोगाच्या तांत्रिक तज्ज्ञांमध्ये लवकरच पुढील चर्चा होईल असे ठरले. या निर्णयामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक होईल, तसेच बनावट मतदार नोंदणी रोखली जाईल. यामुळे निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता वाढेल आणि मतदान अधिक पारदर्शक होईल.

बोगस मतदानाचा प्रश्न निकाली निघणार

ग्रामपंचायत निवडणूकांपासून ते लोकसभा निवडणूकांपर्यंत बोगस मतदान होत असल्याचा आरोप विविध राजकीय नेत्यांकडून तसेच पक्षसंघटनांकडून सातत्याने होत आहे. मतदान ओळखपत्र हे आधार कार्डला लिंक झाल्यास बोगस मतदान, दुबार मतदार नावे या समस्यांना आळा बसेल. आधारला मतदान ओळखपत्र लिंक झाल्यास मतदाराला एकाच ठिकाणी मतदान करणे शक्य होईल, अन्यत्र मतदान करता येणार नाही. त्यामुळे १९५२च्या सार्वत्रिक निवडणूकांपासून बोगस मतदान समस्येचा भस्मासूर आपोआपच निकाली निघणे शक्य होणार असल्याचा दावा राजकीय विश्लेषक विजय घाटे यांनी केला आहे.

## एमजीएममध्ये वार्षिक फॅशन शो 'कलायडोस्कोप – २०२५ चे आयोजन; नामवंत डिझायनर हर्ष गुप्ता, स्वेतेष अंबाडे प्रमुख पाहुणे

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील लिओनार्दो द विंची स्कूल ऑफ डिझाईन (एलएसओडी) तर्फे विद्यार्थ्यांचा वार्षिक फॅशन शो उपक्रम 'कलायडोस्कोप – २०२५' सोमवार, दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या कार्यक्रमाचे आयोजन होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी आज येथे दिली.



यावेळी, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, संचालक प्रा.सुनील तळेकर, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना कुलगुरू डॉ. सपकाळ म्हणाले, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रपती पुरस्कार विजेते नामवंत डिझायनर श्री. हर्ष गुप्ता (मुंबई) तसेच डिझायनर श्री.स्वेतेश अंबाडे (नागपूर) यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'कलायडोस्कोप –२०२५' होणार आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेले सुमारे ६० डिझाईन गारमेंट सादर केली जाणार आहेत. पारंपरिक प्रिंट डिझाईन तसेच अजिंठा आणि वेरुळ लेण्यांमधील कलाकृतींतून प्रेरणा घेऊन यात नाविन्यपूर्ण फॅशन, भविष्यातील फॅशन यांचा वेध घेण्याचा विद्यार्थी प्रयत्न करणार आहेत. विशेष म्हणजे विद्यार्थी मॉडेल या उपक्रमामध्ये रॅम्प वॉक करत सादरीकरण करतील. जेएनईसीच्या लॉनवर सोमवार, दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने भव्य प्रमाणात सादर केलेला हा असा पहिला उपक्रम आहे. एमजीएम विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिकासारखी प्रत्यक्ष प्रकल्पात सहभागी होत अनुभवातून शिकण्याची संधी मिळावी यासाठी पुढाकार घेतला जातो. त्या अंतर्गत विद्यार्थ्यांना या उपक्रमात ही संधी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. 'एलएसओडी' मधील इन्स्टीट्यूट आफ डिझाईनतर्फे गेल्या बारा वर्षांपासून सतत या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत असून संस्थेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम साकारला जात असल्याचे कुलगुरू डॉ.सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

हर्ष गुप्ता आणि श्री. स्वेतेष अंबाडे विद्यार्थ्यांशी स्वतंत्रपणे संवाद साधणार

नामवंत डिझायनर श्री. हर्ष गुप्ता आणि श्री.स्वेतेष अंबाडे हे कलायडोस्कोप –२०२५ मध्ये सहभागी झाल्यानंतर मंगळवार, दिनांक २५ मार्च २०२५ रोजी लिओनार्दो द विंची स्कूल ऑफ डिझाईनमध्ये एका कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. डिझायनर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना या माध्यमातून त्यांच्याशी थेट संवाद साधण्याची संधी उपलब्ध होणार आहे. विद्यार्थ्यांनी यासाठी संस्थेमध्ये सकाळी १० वाजता उपस्थित राहावे, असे आवाहन लिओनार्दो द विंची स्कूल ऑफ डिझाईनचे संचालक प्रा.सुनील तळेकर यांनी केले आहे.

## फेब्रुवारीत घाऊक महागाई २.३८ टक्क्यांपर्यंत वाढली

नवी दिल्ली : देशात फेब्रुवारी महिन्यात घाऊक महागाई २.३८ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. जानेवारीच्या सुरुवातीला घाऊक महागाई दर २.३१ टक्के होता. अन्न उत्पादनांच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्यामुळे महागाई वाढली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने आज, सोमवारी ही आकडेवारी जाहीर केली.

सरकारच्या आकडेवारीनुसार दैनंदिन वापराच्या वस्तूंमधील महागाई ४.६९ वरून २.८१ टक्क्यांपर्यंत कमी झाली. अन्नधान्यांमधील महागाई ७.४७ टक्क्यांवरून ५.९४ टक्क्यांपर्यंत कमी झाली. इंधन आणि विजेचा घाऊक महागाई दर २.७८ टक्क्यांवरून –०.७१ टक्क्यांपर्यंत



वाढला. अन्न उत्पादन उत्पादनांचा घाऊक महागाई दर २.५१ टक्क्यांवरून २.८६ टक्क्यांपर्यंत वाढला. धान्याचा घाऊक महागाई दर ७.३३ टक्क्यांवरून ६.७७ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. डाळींच्या घाऊक किमतीतील महागाई ५.०८ टक्क्यांवरून –१.०४ टक्क्यांपर्यंत कमी झाली आहे. तर भाजीपाल्याचा महागाई दर ८.३५ टक्क्यांवरून –५.८० टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे.

दुधाचा घाऊक महागाई दर २.६९ टक्क्यांवरून १.५८ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. घाऊक महागाईत दीर्घकाळ वाढ झाल्याने बहुतेक उत्पादक क्षेत्रांवर प्रतिकूल परिणाम होतो. जर घाऊक किमती दीर्घकाळ जास्त राहिल्या तर उत्पादक त्याचा भार ग्राहकांवर टाकतात. सरकार फक्त करांच्या माध्यमातूनच घाऊक किंमत निर्देशांक नियंत्रित करू शकते. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली होती, त्याप्रमाणे सरकारने इंधनावरील उत्पादन शुल्क कमी केले होते. तथापि, सरकार केवळ एका मर्यादेतच कर कपात कमी करू शकते. धातू, रसायने, प्लास्टिक आणि रबर यासारख्या कारखान्याशी संबंधित वस्तूंना घाऊक किंमत निर्देशांकामध्ये जास्त महत्त्व असते.

## ज्योतिषतज्ञ संतोष तळेकर महाराष्ट्र राज्य स्तरीय पुरस्कारानी सन्मानित

छत्रपती संभाजीनगर – पुण्यातील विश्व ब्राह्मण समाजसंघ महाराष्ट्र महिला प्रकोष्ठ यांनी महाराष्ट्र राज्य स्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन नुकतेच पद्महॉल टिळक रोड येथे केलेले होते. पुरस्कार सोहळ्याचे मुख्य अतिथी मध्यप्रदेशचे पूर्व राज्य मंत्री पंडित श्रीमान.योगेंद्र महंत आणि महाराष्ट्र राज्य संसद सदस्य डॉ.मेघाताई कुलकर्णी यांच्या हस्ते विविध सामाजिक योगदान देणाऱ्या व्यक्तींनां शाल श्रीफळ पुष्पगुच्छ प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

छत्रपती संभाजी नगर मधील ज्येष्ठ कलावंत तसेच ज्योतिष तज्ञ म्हणून श्रीमान.संतोषजी तळेकर यांना महाराष्ट्र राज्य स्तरीय पुरस्कारानी सन्मानित करण्यात




आले.

छत्रपती संभाजी नगर मधील श्रीमान.संतोषजी तळेकर गेल्या तीन दशकांपासून आपला अजंठा आर्ट्सचा व्यवसाय सांभाळून अनेक कला गुण छंद जोपासलेले आहेत.संतोष तळेकर १०० हून अधिक आवाजांचा बहारदार मिमिक्रीचा कार्यक्रम करतात. न्यूमोरोलॉजी ( अंकगणितशास्त्र ) पोनोलॉजी ज्योतिष , पायथागोरस, लोशोग्रेड ज्योतिष , त्याचं बरोबर आपल्या जन्म तारखेवर आणि आपल्या मराठी हस्ताक्षरावरुन ज्योतिषशास्त्रा नुसार आपल्या भविष्याची वाटचाल कशी असेल याची तंतोतंत उकल संतोष तळेकर करतात.विशेष उल्लेखनीय गोष्ट अशी संतोष तळेकर कसल्याही प्रकारचे मानधन न घेता त्यांनी हजारो लोकांना मार्गदर्शन करुन त्यांच्या जीवनाला नवी दिशा.. नवी आशा दिलेली आहे.

## प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य फुलावे, हाच माझा संकल्प आहे. – गुरुदेव श्री श्री रविशंकर

### गुरुदेव श्री श्री रविशंकर २० ते २३ मार्च दरम्यान जगातील सर्वात मोठ्या आनंद सप्ताहाचे नेतृत्व करणार

छत्रपती संभाजीनगर – चार दशके गुरुदेवांनी श्वास, ध्यान आणि परिवर्तनकारी सुदर्शन क्रियाच्या माध्यमातून कोट्यवधी लोकांपर्यंत आनंद पोहोचविण्याचा एक व्यापक मोहिम पुढे नेली आहे. त्यांच्या साध्या पण प्रभावी तंत्रांनी केवळ व्यक्तींचा ताण हलका केला नाही तर कॉर्पोरेट संस्कृतीला आकार दिला, समाजात सकारात्मक परिवर्तन घडवले आणि जागतिक शांततेसाठीही भरीव योगदान दिले आहे.

१८० हून अधिक देशांतील कोट्यवधी लोक २० ते २३ मार्च दरम्यान गुरुदेवांसोबत जगातील सर्वात मोठ्या आनंद सोहळ्यात सहभागी होण्यासाठी सज्ज आहेत. हा अद्वितीय सप्ताह अंतः शांती, आनंद आणि सर्वांगीण कल्याणासाठी समर्पित असेल. या जागतिक सोहळ्याची सुरुवात २० मार्च, जागतिक आनंद दिनी, सकाळी ८:०० वाजता सत्त्व पवर गुरुदेवांच्या मार्गदर्शित ध्यानाने होणार आहे.

वैज्ञानिक संशोधनानुसार, सुदर्शन क्रिया चिंता ८०% पर्यंत, नैराश्य ७८% आणि तणाव ४६.८% कमी करण्यास सिद्ध झाली आहे. विद्यार्थ्यांपासून ते व्यावसायिक, माजी सैनिक आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांपर्यंत विविध गटांमध्ये झालेल्या अभ्यासांमधून या क्रियाचे दीर्घकालीन मानसिक आणि शारीरिक आरोग्यासाठी फायदेशीर



परिणाम दिसून आले आहेत.

आनंद दिनाचे प्रमुख कार्यक्रम

आनंद सप्ताहाचा एक भाग म्हणून, गुरुदेव श्री श्री रविशंकर वॉशिंग्टन डी.सी.च्या वॉर्नर थिएटरमध्ये हार्वर्ड विद्यापीठाचे प्राध्यापक आणि न्यूयॉर्क टाइम्स बेस्टसेलिंग लेखक आर्थर ब्रूक्स यांच्यासोबत एका विचारप्रवर्तक संवादात सहभागी होणार आहेत. या चर्चेत आजच्या अनिश्चित जगात आनंद कसा जोपासता येईल यावर व्यावहारिक दृष्टिकोन मांडला जाईल.

याशिवाय, गुरुदेवांना गॅलप आणि संयुक्त राष्ट्रांच्या सहकार्याने आयोजित सेमाफोरच्या द स्टेट ऑफ हॅप्पीनेस इन २०२५ या विशेष कार्यक्रमात ध्यान सत्राचे नेतृत्व करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमात २०२५ वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट सादर केला जाईल, जो जागतिक स्तरावरील कल्याणविषयक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन समोर ठेवेल.

जागतिक आनंद कार्यक्रम

या ऐतिहासिक सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर, द आर्ट ऑफ लिव्हिंग १७ ते २३ मार्च दरम्यान ग्लोबल हॅपिनेस प्रोग्रॅम आयोजित करत आहे. या कार्यक्रमाद्वारे हजारो लोकांना तणाव व्यवस्थापन, भावनांचे संतुलन आणि जीवनातील समतोल साधण्यासाठी प्रभावी तंत्र शिकवले जात आहे. सुदर्शन क्रिया हे त्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे, ही एक शक्तिशाली लयबद्ध श्वसन पद्धती असून, ज्याने जगभरातील लाखो लोकांचे जीवन बदलले आहे. जग आनंदाच्या शोधात असताना, गुरुदेवांचा संदेश एक साधा पण प्रभावी विचार मांडतो: आनंद हा इथे आणि आत्ताच आहे.

या मोहिमेत सहभागी व्हा! २० मार्च रोजी सकाळी ८:०० वाजता सत्त्व पवर गुरुदेवांसोबत ध्यान करा!

## 'मराठवऱ्हाड'चे ५ वर्षांत दररोज ११ लाख किलो दूध खरेदीचे लक्ष्य

### महिलांच्या नवस्थापित दूध उत्पादक संघाची महत्त्वाकांक्षी योजना

छत्रपती संभाजीनगर , १८ मार्च : महिलांच्या नेतृत्वाखालील नव्यानेच स्थापन झालेल्या मराठवऱ्हाड दूध उत्पादक संघटनेने पुढील ५ वर्षांत दररोज ११ लाख किलो दूध खरेदी करण्याचे तसेच १,८०० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल साध्य करण्याचे लक्ष्य बाळगले आहे.

उत्पादकांच्या मालकीच्या संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या (एनडीडीबी) आदेशानुसार, विदर्भ व मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाचे (व्हीएमडीडीपी) विद्यमान कामकाजसुद्धा मराठवऱ्हाड दूध उत्पादक संघटनेच्या कक्षेत आणले जाणार आहे.

अशा शेतकरी-मालकीच्या संस्थांना सुविधा देण्याचा अनुभव असलेल्या एनडीडीबी डेअरी सर्व्हिसेस (एनडीडीबीची पूर्ण मालकीची ना नफा उपकंपनी) हिला मराठवऱ्हाड एमपीओला तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. मराठवऱ्हाड एमपीओने खरेदी केलेल्या दुधासाठी मदर डेअरी फॉरवर्ड लिंकेज प्रदान करत राहील.

विदर्भ आणि मराठवाडा भागातील ६,००० गावे संघटित दूध खरेदी नेटवर्क अंतर्गत समाविष्ट करणे आणि १.८५ लाख महिला दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांना सदस्य म्हणून नोंदणी करणे हे महिलांच्या मालकीच्या आणि महिलांच्या नेतृत्वाखालील नव्याने स्थापन झालेल्या मराठवऱ्हाड एमपीओचे उद्दिष्ट आहे.

आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व गावांमध्ये स्वयंचलित, निष्पक्ष आणि पारदर्शक दूध संकलन प्रणाली स्थापित करण्याची मराठवऱ्हाड एमपीओची योजना आहे. महिला सदस्यांच्या बँक खात्यात थेट नियमित आणि वेळेवर दुधाचे पेमेंट होईल हे सुनिश्चित करणे हे यामागील उद्दिष्ट आहे.

एनडीडीबी आणि महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशात दुग्धव्यवसाय विकासासाठी २०१३ मध्ये सामंजस्य करार केला होता. या भागातील शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे हा त्याचा उद्देश होता.

दुष्काळग्रस्त आणि संकटग्रस्त प्रदेशांमध्ये दुग्धव्यवसाय हा अधिक समावेशक उपजीविकेचा पर्याय आहे. त्यामुळे कृषी पिकांच्या तुलनेत त्याचे बचत मूल्य चांगले असल्याचे सिद्ध झाले आहे. हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या जोखमी कमी करण्याच्या उद्देशाने हा करार करण्यात आला होता.

विदर्भ आणि मराठवाडा दुग्धविकास प्रकल्प (व्हीएमडीडीपी) अंतर्गत दहा जिल्ह्यांतील दूध उत्पादकांनी उत्पादित केलेल्या दुधाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे काम एनडीडीबीच्या पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या मदर डेअरीला देण्यात आले होते.

हा प्रकल्प २०१६ पासून विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि बुलढाणा या दहा जिल्ह्यांमध्ये आणि मराठवाड्यातील नांदेड, उस्मानाबाद, लातूर आणि जालना या जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे. या भागातील सुमारे ३५,००० दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांकडून दररोज ४ लाख लिटर दूध संकलन केले जात असून ते सर्व १० जिल्ह्यांमधील २,५०० दूध संकलन केंद्रांमधून खरेदी केले जात आहे. यावरून या प्रकल्पावरील शेतकऱ्यांचा विश्वास दिसून येतो.

विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाचे विद्यमान कामकाज या एमपीओच्या कक्षेत आणले जाईल. उत्पादकांच्या मालकीच्या संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी एनडीडीबीच्या आदेशानुसार हे करण्यात येत आहे, असे या संबंधीच्या निवेदनात म्हटले आहे.

नागपूरला मुख्यालय असलेली ही संस्था शेतकऱ्यांना त्यांच्या दारी तांत्रिक इनपुट सेवा प्रदान करेल. त्यामुळे त्यांच्या कार्यक्षेत्रात दूध उत्पादकता वाढेल. यात दर्जेदार पशुखाद्य आणि चारा उत्पादन आणि पुरवठा यांचा समावेश आहे.याशिवाय, या संस्थेच्या संपूर्ण मूल्य साखळीशी संबंधित उत्पादक संचालक, सदस्य आणि इतर भागधारकांच्या सतत क्षमता बांधणीवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## माऊलीच्या जय घोषात कृषी संस्कृती महोत्सवाचा समारोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च -** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने लातूर दयानंद सांस्कृतिक सभागृहात चालु असलेल्या कृषी संस्कृती महोत्सवाचा समारोप उत्साहात संपन्न झाला.

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने पहिल्यांदाच राबविण्यात आलेल्या कृषि संस्कृती महोत्सवाच्या कार्यक्रमाच्या शेवटच्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका संज्योती जगदाळे, गायक अभिषेक नलावडे,अक्षय घाणेकर, लातूरची सुप्रसिद्ध गायिका आसावरी बोधनकर,यांच्या चमूने ग्रामीण कृषि संस्कृतीचे दर्शन घडविणारे अभंग,भारुड,लावणी, असे एकाहून एक सदाबहार गाणी सादर करून,उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.कार्यक्रमाची सुरुवात गायक अक्षय घाणेकर यांनी गणरायाच्या आराधनाने केली. लातूर येथील रंगभूमी कलामंचच्या वतीने सादर करण्यात आलेल्या आम्ही जातीचे शेतकरी खातो कष्टाची भाकरी, या गीतावरील नृत्याविष्काराने श्रोत्यांना खिळवून ठेवले. शेवटच्या दिवशी लातूरकरांनी कार्यक्रमाला लावलेली उल्लेखनीय उपस्थिती पाहून या कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी आलेले कलाकार भारावून गेले. कलाकारांच्या प्रत्येक सादरीकरणानंतर लातूरकरांचा प्रतिसाद हा कलाकारांचा उत्साह वाढवीत होता.या नेत्रदीपक कार्यक्रमाचे निवेदन सद्दाम शेख यांनी केले. सद्दाम शेख यांनी निवेदन सादर करीत करीतच ज्येष्ठ मराठी सिनेकलावंत निळू फुले,सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या आवाजाची उभे उभ मिमिक्री करत व हास्य विनोद करीत कार्यक्रमाची रंगत वाढविली.अँड मिरा कुलकर्णी यांनी शेतकऱ्यांच्या जीवणावर आधारीत कविता सादर करत उपस्थित रसिकांची मने जिकली.समारोप प्रसंगी गायकांचा कवींचा सन्मान करण्यात आला.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### विवेकानंद संस्कार संस्थेचा सुवर्ण महोत्सवानिमित्त विवेक घळसासी यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** विवेकानंद संस्कार संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त लातूर येथे ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

विवेकानंदांचे हिंदुत्व या विषयावर विवेक घळसासी हे मार्गदर्शन करणार आहेत.उद्योजिका श्रीमती मृणाल कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. मंगळवार दि. १८ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता दयानंद सभागृहात व्याख्यान संपन्न होणार आहे. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन विवेकानंद संस्कार संस्थेचे अध्यक्ष संजय पांडे, सचिव प्रदीप नणंदकर, सुवर्ण महोत्सव समिती प्रमुख संजय अयाचित, सहप्रमुख यशवंत अणदूरकर यांनी केले आहे.

### एकाच दिवसात सहा टेस्ट ट्यूब बेबींचा जन्म

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने अपत्यसुखापासून वंचित दाम्पत्यांसाठी आशेचा किरण ठरणाऱ्या येथील के. जी. एन. टेस्ट ट्यूब बेबी हॉस्पिटलमध्ये एकाच दिवशी तब्बल सहा टेस्ट ट्यूब बेबींचा जन्म झाला आहे. वंध्यत्वावर मात करण्याच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.



'वंध्यत्वाकडून मातृत्वाकडे' हे ब्रीदवाक्य असलेल्या केजीएन हॉस्पिटलचे संचालक डॉ. आमिर शेख हे आहेत. आयव्हीएफ उपचाराद्वारे अपत्यप्राप्तीचा आनंद घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्यांसाठी केजीएन हॉस्पिटल एक विश्वासार्ह केंद्र बनले आहे. अपत्यप्राप्तीसाठी संघर्ष करणाऱ्या जोडप्यांसाठी आयव्हीएफ (इन-विट्रो फर्टिलायझेशन) तंत्रज्ञान वरदान ठरत आहे. या प्रक्रियेद्वारे जन्मलेली ही सहा बाळं त्यांच्या कुटुंबीयांसाठी आनंदाची पर्वणी ठरली आहेत. या नवजात बाळांचे कुटुंबीय आपल्या आनंदाला शब्दांत व्यक्त करू शकत नव्हते. आम्ही अनेक वर्षे मातृत्वासाठी संघर्ष केला. केजीएन हॉस्पिटलमुळे आमचे स्वप्न पूर्ण झाले, असे एका बाळाच्या आईने सांगितले.

### जयंती समितीच्या अध्यक्षपदी बलभीम कोथिंबिरे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अत्यन्त उत्साहात साजरी करण्यासाठी मागासवर्गीय सेवानिवृत्त कर्मचारी संघ लातूर च्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवानिवृत्त कर्मचारी जयंती उत्सव समिती स्थापन करण्यात आली.

या समितीच्या अध्यक्षपदी बलभीम कोथिंबीरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीत उपाध्यक्ष अॅड. माणिक पवार, सचिव विनायक बोरीकर, सहसचिव मोहन कांबळे, संघटक बी. बी. गायकवाड, सह संघटक डी.एन. कांबळे, कोषाध्यक्ष पी. एस. कांबळे आदिंचा समावेश करण्यात आला आहे.

### भररस्त्यात रहदारीला अडथळा; ऑटो चालकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** सार्वजनिक रस्त्यावर मधोमध ऑटो उभा करून रहदारीला अडथळा निर्माण केल्याची घटना जुने बसस्थानकासमोर रोडवर घडली. याबाबत फुलचंद अंकुश होळंबे यांनी गांधी चौक पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून ऑटो चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ऑटो उभा करून रहदारीला अडथळा निर्माण केला. स्वतःच्या व इतरांच्या जीवितास धोका निर्माण केल्याची स्थिती केल्याने चालकावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## उन्हाच्या काहिलीने अंगाची लाहीलाही

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** मागील आठवडाभरापासून लातूर शहरासह जिल्ह्यात उन्हाच्या कडाक्यात चांगलीच वाढ होताना दिसत आहे. वरचेवर तापमानाचा पारा वर वर चढत आहे. शनिवारपर्यंत ३६ अंश सेल्सिअसपर्यंत असणारे तापमान रविवारी दुपारी दोन ते तीन या वेळेत तब्बल ३९ अंशापर्यंत गेल्याचे दिसून आले. यामुळे लातूरकरांच्या अंगाची लाहीलाही होताना दिसत आहे. उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव करण्यासाठी नागरिक विविध मार्गाचा अवलंब करीत आहेत.



लातूर जिल्ह्यात यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे हिवाळाही चांगलाच जाणवला. परंतु, तो ठरावीक दिवसच होता. हिवाळा सुरू असतानाच मागील आठवडाभरापासून कडक ऊन पडत आहे. वरचेवर वातावरणातील थंडी गायब होऊन कडक उन्हात वाढ होताना दिसत आहे. मागील आठ दिवसांपर्यंत लातूर शहरातील तापमान ३५ अंश सेल्सिअसपर्यंत होते.

### टोप्या, गमजे विक्रीत वाढ

सकाळपासूनच उन्हाची तीव्रता जाणवत असल्याने नागरिक बचवासाठी टोप्या घालत असून अनेकांच्या डोक्यावर गमचे दिसत आहेत. उन्हाची तीव्रता पाहून अनेकांची पावले शीतपेयाच्या दुकानाकडे वळत आहेत. मठ्ठा, लिंबू शरबत विक्री करणाऱ्या गाड्यांभोवती नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

परंतु, यात वाढ होण्यास सुरूवात झाली आहे. गेल्या आठ दिवसांवर नजर टाकल्यास मागच्या रविवारी ३५, सोमवारी ३७, मंगळवारी ३८, बुधवारी ३९, गुरुवारी ३८, शुक्रवारी ३७, शनिवारी ३६ तर आज रविवारी दुपारी दोन ते तीन या वेळेत तब्बल ३९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. सकाळपासूनच उन्हाचा कडाका जाणवत आहे. सूर्य डोक्यावर जाईल तसे ऊन वाढत आहे. दुपारी दोन ते तीन या वेळेत तर पादचारी व दुचाकीस्वारांना हे ऊन असह्य होत आहे.

उन्हाचे चटके पायाला जाणवत आहेत. डोक्यालाही ऊन लागत आहे. यामुळे दुपारच्यावेळी शहरातील प्रमुख रस्त्यांवरील गर्दी विरळ होताना दिसत आहे.

## स्त्री रोग लॅप्रोस्कोपी संघटनेच्या अध्यक्षपदी बरमदे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** अखिल भारतीय स्त्री रोग लॅप्रोस्कोपी संघटनेच्या (आयएजीई) अध्यक्षपदी लातूर येथील ख्यातनाम स्त्री रोग तथा वंध्यत्व तज्ज्ञ डॉ. कल्याण बरमदे यांची निवड करण्यात आली आहे. डॉ. बरमदे यांच्या रूपाने मराठवाड्याला दुसऱ्यांदा हा बहुमान प्राप्त झाला आहे.

भारतीय स्त्री रोग लॅप्रोस्कोपी संघटना व अमेरिकन लॅप्रोस्कोपी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १४, १५ व १६ मार्चला पुण्यातील हॉटेल जे डब्ल्यू मेरियटमध्ये इंडियन असोसिएशन ऑफ गायनॅक इंडोस्कोपिस्ट वार्षिक परिषद संपन्न झाली. या परिषदेत डॉ. कल्याण बरमदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या कार्यक्रमात संघटनेच्या सचिवपदी अहमदाबादच्या डॉ. सुजल मुन्शी यांची , उपाध्यक्षपदी मुंबईच्या डॉ. सुधा टंडन , कोषाध्यक्षपदी सुरतच्या डॉ. सेजल नाईक यांची तर सहसचिवपदी बंगळुरुच्या डॉ. विद्या भट यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ.पी.के. शहा, डॉ. प्रकाश त्रिवेदी, डॉ. पंडित पळसकर, डॉ. ऋषिकेश पै, डॉ. शाम देसाई, डॉ. राजेंद्र संकपाळ, तसेच डॉ. संजय पटेल, डॉ.पीजी. पॉल , डॉ. कुरियन जोसेफ, डॉ. हाफिज रहेमान, डॉ. संदेश कादे, डॉ. किशोर पंडित, डॉ. विवेक साळुंके, डॉ.नितीन शहा, डॉ. राजेश दराडे आदिंची उपस्थिती होती.

## बांधकाम अडविले म्हणून एकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** ट्रॅक्टरमधून बांधकाम साहित्य प्लॉटवर टाकत असताना या जमिनीचा वाद आहे. प्लॉटवर साहित्य टाकू नका, असे फिर्यादीने म्हटले असता आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या अंगावर धावत जावून तू बांधकाम का अडवतोस असे म्हणून लाथाबुक्क्यांनी मारहाण करून डाव्या हाताच्या मनगटावर मारून जखमी केले.

तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना औसा तालुक्यातील कन्हेरी येथे घडली. याबाबत दिगंबर झिरमिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वामन बोडके व अन्य तिघांविरुद्ध औसा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

या जमिनीचा वाद असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे बांधकामाचे साहित्य येथे टाकू नका, असे म्हटले असता फिर्यादीला जबर मारहाण करण्यात आली. जिवे मारण्याची धमकीही दिली. याप्रकरणी पुढील तपास चालू असल्याची माहिती पोलीस ठाण्यातून देण्यात आली.

## मोहोळचा कुस्तीपटू भैरव मुळे ठरला अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवात स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय राजा हरिश्चंद्र जाधव यांच्या स्मरणार्थ रोख ११ हजाराची ची कुस्ती मोहोळच्या भैरव मुळे याने उदगीरच्या आबा गायकवाडला आस्मान दाखवत जिंकली.



श्री सिद्धेश्वर रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने पार पडत असलेल्या यात्रा महोत्सवात कुस्ती स्पर्धा हे लातूरकरांचे आकर्षण असते या कुस्त्यांची दंगल रविवारी सायंकाळी सिद्धेश्वर देवस्थानच्या परिसरात आयोजित करण्यात आली होती. यात्रा महोत्सवात होणाऱ्या या कुस्ती स्पर्धामध्ये केवळ लातूर जिल्हाच नव्हे तर मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक कुस्तीवीर यांनी सहभाग नोंदवला .त्यामुळे ही कुस्ती स्पर्धा अतिशय चुरशीची झाली. ही कुस्ती स्पर्धा पाहण्यासाठी लातूरकरांनी गर्दी केली होती .

देवस्थानच्या वतीने या कुस्ती स्पर्धेमध्ये चांदीची गदा तसेच चांदीचे कडे ,मानाचा फेटा व रोख बक्षिसे देऊन कुस्तीगीरांचा सन्मान करण्यात आला .यामध्ये शिवसेना शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा संपर्क प्रमुख अॅड. बळवंतराव जाधव यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ रोख अकरा हजाराचे बक्षीस ठेवले होते. स्वातंत्र्य सेनानी राजा हरिश्चंद्र जाधव यांच्या स्मरणात ११ हजाराचे हे बक्षीस मोहोळच्या भैरव मुळे याने अटीतटीच्या लढतीमध्ये उदगीरच्या आबा गायकवाडला आस्मान दाखवत जिंकले.

अॅड.बळवंतराव जाधव, अॅड. अर्जुन जाधव, सुरेश गोजमगुंडे, बाबासाहेब कोरे व्यंकटेश हालिंगे अशोक भोसले,नरेंद्र जाधव आर्दीच्या यावेळी उपस्थिती होती.

## बहुजन महिला आजही सत्तेपासून वंचित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** गेल्या अनेक वर्षांपासून सत्ता पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या हातात असल्याने येथील बहुजन महिला आजही सत्तेपासून, राजकारणापासून वंचित आहेत. महिलांना आजही अतिशूद्र समजले जात आहे. जोपर्यंत स्त्रियांना समानतेचा अधिकार प्रत्यक्षात मिळणार नाही, तोपर्यंत या देशाची प्रगती होणार नाही, असे प्रतिपादन सातारा येथील सुप्रसिध्द विचारवंत प्रा. कविता म्हेत्रे यांनी केले.



बहुजन नायक कांशीराम यांच्या जयंतीनिमित्त 'जी-२४ लातूर'तर्फे भालचंद्र ब्लड बँकेच्या सभागृहात रविवारी आयोजित बहुजन समाज प्रबोधन शिबिरात दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रात 'बहुजन महिलांच्या राजकारणाची व्याप्ती आणि मर्यादा' या विषयावर प्रमुख वक्त्या म्हणून प्रा. म्हेत्रे या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुनीता अरळीकर होत्या. यावेळी डॉ. अशोक नारनवरे, मीना कांबळे, जनाबाई शिंदे, सुप्रिया गायकवाड, डॉ. सुशीला पिंपळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रा. म्हेत्रे म्हणाल्या, भारतीय स्वतंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही राजकारणात उच्चवर्णीय स्त्रीयांचे तेही त्रोटक स्थान आहे. किती बहुजन स्त्रिया मुख्यमंत्री, आमदार, खासदार झाल्यात? उच्च वर्णीय स्त्रियाच निवडून आल्या आहेत. आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत ज्या महिला निवडून येतात, त्यांचा कारभार पती किंवा गावातील पुढारी पाहतो. महिलांना अधिकारापासून दूर ठेवले जाते. त्यामुळे ३३ टक्के महिला आरक्षणात ५० टक्के आरक्षण बहुजन, दलित, आदिवासी महिलांना पाहिजेच, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. मारुती गायकवाड यांनी केले. रावणराजे आत्राम यांनी स्त्रीयांच्या राजकारणातील सहभागाबद्दल विचार मांडले. स्त्रीला समान दर्जा मिळेल तेव्हाच देशाची प्रगती होईल असे ते म्हणाले.

डॉ. नारनवरे म्हणाले प्राचीन काळी स्त्रिया सबळ होत्या. शेतीचा शोध त्यांनीच लावला. मात्र १९५० पूर्वी मतदानाचा अधिकार उच्च वर्णीय स्त्रियांनाच होता. स्वतःचे हक्क आणि धर्मासाठी या स्त्रिया लढत होत्या. बहुजन स्त्रियांना मतदानाचा अधिकारही नव्हता. महिलांना राजकारणापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचे कारस्थान पुरुषसत्ताक व्यवस्थेने केले असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात अरळीकर यांनी स्त्रीयांची कोंडी प्रत्येक क्षेत्रात कशी केली जात आहे यावर प्रकाश टाकला.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी चिकटे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी सुशीलकुमार चिकटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. जयंती समितीच्या कार्यकारिणी निवडीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे बैठक झाली.

या बैठकीत अध्यक्षपदी सुशीलकुमार चिकटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. अन्य कार्यकारिणी अशी : सचिव राहुल कांबळे, गोविंद कांबळे, कोषाध्यक्ष बाबासाहेब कांबळे, कार्याध्यक्ष रमक जोगदंड, निखिल गायकवाड, डॉ. विजय अजनीकर, रामभाऊ कोरडे, संघटक विनय जाकते, रणधीर सुरवसे, उपाध्यक्ष अॅड. अभय कांबळे, अमोल शिंदे, सहसचिव विजय चौधरी, विनोद कोल्हे, सहसंघटक विशाल वाहुळे, नीलेश बनसोडे, बालाजी कांबळे,



सहकोषाध्यक्ष रवी कांबळे, सिद्धार्थ लामतुरे, सांस्कृतिक प्रमुख सचिन गायकवाड, सदस्य बाळासाहेब गायकवाड, गोविंद कांबळे, ऋषी दुवे, प्रसिद्धी प्रमुख डॉ. सितम सोनवणे यांची निवड करण्यात आली.

## सहकार चळवळ सक्षम करणार : सहकारमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** जिल्हा मध्यवर्ती बँकेचा अध्यक्ष, संचालक राहिल्याने सहकार क्षेत्राचा दांडगा अनुभव माझ्या पाठिशी आहे. मराठवाड्यातील इतर जिल्ह्यातील जिल्हा बँकेची स्थिती आणि लातूर जिल्हा बँकेची स्थिती यामध्ये मोठा फरक आहे. योग्य नेतृत्त्व मिळाल्यानेच बँकेची ही प्रगती आहे. आता सहकार क्षेत्रातील अनुभवाचा वापर करून राज्यात सहकार चळवळीला गती देणार असल्याचे प्रतिपादन सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.



लातूर जिल्हा बँकेच्यावतीने सहकारमंत्री पाटील व आमदार अमित देशमुख यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाबासाहेब पाटील यांनी बँकेची जडणघडण आणि वाटचाल अधोरेखित केली.

यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित देशमुख, जिल्हा बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख, व्हाईस चेअरमन अॅड. प्रमोद जाधव, माजी आमदार त्रिंबक भिसे, वैजनाथ शिंदे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, अशोक गोविंदपूरकर, अशोक पाटील निलंगेकर, संभाजी सूळ, यशवंत पाटील, अॅड. बाबासाहेब गायकवाड, शीलाताई पाटील, मीना सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मंत्री पाटील म्हणाले, सुरूवातीच्या काळात पैसे वसूल करणे हे सर्वात अवघड काम होते. कर्मचाऱ्यांच्या पगारीला पैसे नव्हते. त्यामुळे मोडलेला कारभार पुन्हा कसा उभा राहू शकतो हे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या नेतृत्त्वाकडे पाहिल्यावर लक्षात येते. आज सहकारमंत्री असलो तरी अगोदर जिल्हा बँकेचा संचालक आहे. याच बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्याची संधी मिळाली. तळागळात असलेल्या संपर्काचा फायदा प्रत्येक विधानसभा निवडणुकीत झाला आहे. तर आता ही सर्व जबाबदारी तुमची म्हणत स्व. विलासराव देशमुख यांनी यांनी बँकेची धुरा माजी मंत्री दिलीपराव देशमुख व आमच्यासारख्या तरुणांच्या खांद्यावर सोपविली. त्यामुळेच मी संचालक आणि आता सहकारमंत्री झालो. त्यामुळे आजचा सत्कार हा खऱ्या अर्थाने विलासराव देशमुख यांच्या विचारांचा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी दिलीपराव देशमुख म्हणाले, निवडणुकीपुरते राजकारण हीच लातूरची परंपरा राहिलेली आहे. एकदा निकाल लागला की सत्ताधारी आणि विरोधातले हे केवळ विकासाचे राजकारण करतात. आता सहकारमंत्री पाटील यांचा सत्कार समारंभ हा खऱ्या अर्थाने कौटुंबिक सोहळा आहे. बाबासाहेब पाटील यांचा राजकीय प्रवास हा 'ग्राऊंड टू अर्थ' असा आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्त्वाचा फायदा हा राज्याला होईल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आमदार अमित देशमुख म्हणाले, लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात वेगळे चित्र होते. त्याचवेळी याच जिल्हा बँकेच्या मंचावरून बाबासाहेब पाटील यांना 'आमच्याकडे या', असे आवाहन केले होते. मात्र, ते आपल्या मतावर ठाम राहिले आणि महायुतीकडूनच निवडणूक लढविली. निवडणुकीत त्यांचा मोठ्या मताधिक्क्याने विजय झाला. त्यांनी त्यावेळी घेतलेला निर्णय आज खऱ्या अर्थाने सार्थकी लागला असून, ते केवळ सत्तेतच आले नाहीत, तर सहकार मंत्रीपदी विराजमान झाले आहेत. त्यांची हॉटलाईन थेट आता अमित शाह यांच्याशी असल्याचेही आमदार देशमुख शेवटी म्हणाले.

## आमदार देशमुखांच्या सूचनेनंतर पोहरेगाव बॅरेजची केली दुरुस्ती



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ मार्च -** पोहरेगाव बॅरेजची गळती थांबवण्याची मागणी शेतकऱ्यांनी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्याकडे केल्यानंतर त्यांनी तातडीने जलसंपदा विभागास या बॅरेजची गळती थांबविण्यासाठी सूचना दिल्यानंतर बॅरेजची तातडीने दुरुस्ती करण्यात आली.

पोहरेगाव बॅरेजच्या गेटला तांत्रिक अडचणींमुळे पाण्याची गळती होत होती. ही गळती थांबवण्यासाठी शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाकडे वारंवार मागणी केली. परंतु, त्यांची दखल घेण्यात आली नाही. अखेर रामेश्वर येथील शेतकरी शरद रामकृष्ण पाटील यांनी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्याकडे या समस्येबाबत तक्रार केली.

आमदार देशमुख यांनी तत्काळ जलसंपदा विभागाला दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. तसेच, या कामावर लक्ष ठेवण्यासाठी आपले प्रतिनिधी पाठवले. त्यांच्या सूचनेनुसार, जलसंपदा विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी पोहरेगाव बॅरेज येथे पोहोचले आणि त्यांनी तातडीने दुरुस्तीचे काम पूर्ण केले. माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या सूचनेची तातडीने दखल घेऊन जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता अमर पाटील, कनिष्ठ अभियंता अमर गिरी व सहायक गणेश सोनटक्के यांनी पोहरेगाव बॅरेज येथे जाऊन गेट दुरूस्ती करून होणारी पाण्याची गळती थांबविण्यासाठी आवश्यक कामे केली. याबाबत शेतकरी शरद पाटील, ज्ञानेश्वर चव्हाण, दशरथ केसरे, अभिजीत केसरे, विशाल मोरे, राजाभाऊ मोरे आणि नाना देशमुख यांनी समाधान व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ३० विद्यार्थिनींना मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून शिष्यवृत्तीचे वितरण

## शिक्षणाद्वारे महिला सक्षमीकरणाच्या समूहाच्या दृष्टिकोनाला बळकटी




नांदेड, १७ मार्च २०२५ : भारतातील आघाडीचा व्यवसाय समूह आणि मलाबार गोल्ड अँड डायमंड्सची पालक कंपनी असलेल्या मलाबार ग्रुपने नांदेडमधील शंकरराव चव्हाण स्मारक सभागृहात ३० पात्र विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती प्रदान करून तरुणींना शिक्षणाद्वारे सक्षम करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पूर्तता केली. या विद्यार्थिनींना आर्थिक अडचणींशिवाय त्यांच्या शैक्षणिक आकांक्षा पूर्ण करण्याचा अधिकार मिळावा यासाठी शिष्यवृत्तीच्या रूपाने या प्रसंगी एकूण २,७४,०००/- रुपयांचे वाटप करण्यात आले.

महाराष्ट्र विधानसभेच्या माननीय सदस्या श्रीमती श्रीजया अशोकराव चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शिष्यवृत्ती वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमात त्यांच्या उपस्थितीने समाजात महिलांचे स्थान उंचावण्यासाठी, महिला शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित केले गेले.

नांदेडमधील या शिष्यवृत्ती वितरण कार्यक्रमातून संपूर्ण भारतात शिक्षण आणि कौशल्य विकासाला पाठिंबा देण्याच्या या समूहाच्या व्यापक प्रयासांना ठळकपणे अधोरेखित करण्यात आले आहे. शाश्वत उपक्रमांना पाठिंबा देण्याच्या मलाबार समूहाच्या व्यापक ध्येयामुळे भविष्यातील पिढ्यांना सक्षम बनविण्यासाठी आणि सर्वांसाठी समावेशक, शिक्षित समाज निर्माण करण्यासाठी समूह वचनबद्ध राहिला आहे.

या उपक्रमाबाबत बोलताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद म्हणाले, शिक्षणाद्वारे प्रगतीचा पाया रचला जातो आणि तरुणींना ज्ञानाने सुसज्ज करणे हा सकारात्मक बदल घडवून आणण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. या शिष्यवृत्ती केवळ या मुलींना आर्थिक मदत करण्यासाठी नसून, तर ही आपल्या समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी झालेली गुंतवणूक देखील आहे. ज्यामुळे या तरुणींच्या प्रतिभेची पूर्णत्वाने भरारी आणि त्यांच्या यशाच्या पूर्ततेत भर घातली जाण्यासह, कोणत्याही आर्थिक अडचणींची त्यात बाधा येणार नाही याची खात्री केली गेली आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६९) सजगता

एकदा एका शिबिरात गीत गायन सुरू होते. त्याची प्रॅक्टिस करणे चालू होते. ते शेवटच्या दिवशीच्या कार्यक्रमात म्हणायचं होतं. गीताचे बोल होते 'तुम करो राष्ट्र आराधन' श्री गुरुजींनी हे ऐकले व गीताच्या ओळीतील तुम शब्दा ऐवजी हम शब्द म्हणायला लावला. नंतर गुरुजी म्हणाले ही आराधना आम्ही सर्वांनी करायची आहे. आम्ही स्वयंसेवक नेहमीच मातृभूमीच्या निर्माणाची, उत्कर्षाची, विकासाची, उत्क्रांतीची आस धरू; तेव्हाच ही आपली भारत माता पुन्हा एकदा जगत जननीचे रूप धारण करेल. आणि मग गीताच्या ओळी झाल्या हम करे राष्ट्र आराधन. जे गीत आता सर्वांना प्रिय झालेले आहे. हे गीत पुढील अलक मध्ये लिहीत आहे. असेच एकदा बाल शिबिरात दीप बुझाना हा खेळ सुरू होता. गुरुजींनी सांगितले दीप प्रज्वलित करना चाहिए. त्वरित त्या खेळाचे नाव बदलून 'आव्हान' हे नाव ठेवले. आणि मग या खेळात अनेक ज्योती प्रज्वलित झाल्या. गोष्ट साधी पण सजगता खूप. क्रमशः

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१, माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# तब्बल २७ वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा



सिल्लोड - तालुक्यातील पालोद येथील यशवंत विद्यालय येथे १९९८ सालच्या दहावीच्या बॅचच्या विद्यार्थ्यांचा तब्बल २७ वर्षानंतर स्नेह मेळावा उत्साहात पार पडला यावेळी खेळीमेळीच्या वातावरणात जुन्या आठवणींना उजाळा दिला यावेळी माजी मुख्याध्यापक दिवानराव शिंदे, तेजराव जंजाळ, आकाशराव पांढरे, ज्ञानेश्वर काकडे , सुभाष गोरे, संजीव दौड, संजय बनसोड, विष्णू फरकाडे, कृष्णा बावस्कर, बाबु पठाण, पांडुरंग दणके या तत्कालीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती .

सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शिक्षकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. या सर्व माजी विद्यार्थ्यांनी शाळेला घड्याळ भेट दिली.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर काकडे यांनी सुखी जीवनासाठी व्यस्त जीवनात वेळ काढून एकमेकांना भेटायला हवे असे मत व्यक्त केले तसेच व्यवसाय किंवा नोकरी करणाऱ्या बरोबरच शेतकऱ्यांनी स्वतः ला मालक समजणे आवश्यक आहे कारण शेतकरी हा सर्वांचा पोशिंदा आहे असे त्यांनी यावेळी सांगितले.

रामकृष्ण गायकवाड यांनी आई ही कविता विद्यार्थ्यांना ऐकवली त्यामुळे विद्यार्थी पुन्हा एकदा आई कवितेच्या आठवणीत भावविभोर झाले. सर्व शिक्षकांनी याप्रसंगी आपले भावस्पर्शी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रत्नप्रभा बोराडे यांनी केले तर सर्वांचे आभार सुरेश ढोरमारे यांनी मानले. डॉ. राहुल पालोदकर, गजानन पालोदे विजय मरकड, समाधान बावस्कर, खंडू आपार, राजू गोरे, प्रकाश जाधव आदी विद्यार्थ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. जवळपास ७० विद्यार्थी व विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# कृषीभूषण शेतकरी अरूण सोहणी यांना विविध मान्यवरांच्या हस्ते सेवागौरव पुरस्कार सन्मानित



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१८ मार्च

छत्रपती संभाजीनगर येथील सुलक्ष्मी बहुउद्देशीय संस्था व माणुसकी समूहाच्या वतीने सोयगाव येथील युवा शेतकरी कृषी भूषण अरुण सोहनी यांना सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.माणुसकी समुहाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते दि १५ शनिवारी पुरस्कार सोहळा संपन्न झाला.आर्यवर्त इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी त्रिपुरा चे कुलगुरू डॉ.प्रकाश करमाडकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.यावेळी संत्यापाल महाराजाचे शिष्श खंजिरीवादक पंकजपाल महाराज,सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील इंगळे,उद्योजक मनोज कदम,सामाजिक कार्यकर्ते शामकुमार वानखेडे, सुनील कोटकर,शंकर वाघमोडे,धोंडीरामसिंह राजपूत, विनय कापकर,सुमित पंडित,पुजा पंडीत यांची प्रमुख उपस्थिती होती.विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या ३६ जणांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यात सोयगाव येथील कृषी भूषण शेतकरी अरुण सोहनी यांना सेवा गौरव पुरस्कार देण्यात आला.प्रास्ताविक शरद सोनवने तर सुत्रसंचालन ब.सो.काबळे यांनी करत सुलक्ष्मी बहुउद्देशीय संस्था व माणुसकी समूहाचे संस्थापक अध्यक्ष सुमीत पंडीत यांनीही मनोगत व्यक्त केले.

या पुरस्कार बद्दल सोयगाव शहरातील तिळवण तेली समाजाचे अध्यक्ष राजेंद्र दुतोंडे,डॉ.अजय वाढेकर,भुषण सोहणी,मंगेश सोहणी,मोती जोहरे,किरण पाटील,संतोष सोहणी,विनोद सोहणी,संदिप सोहनी,विशाल घन,संजय कासार,संतोष सोनवणे,दिलीप मालोदे डिगांबर वाघ,विष्णू मापारी,आदींसह यांनी कृषी भूषण प्राप्त अरुण सोहणी यांना शुभेच्छा व अभिनंदन केले.

# शार्क टँक इंडियाच्या नवीनतम भागात ३ कोटींची गुंतवणूक

मुंबई - १३ मार्च रोजी सोनी लिव वर प्रसारित झालेल्या बिझनेस रिॲलिटी टीव्ही मालिकेतील शार्क टँक इंडियाच्या नवीनतम भागात, स्मार्ट कॅज्युअलमध्ये विशेषज्ञता असलेल्या समकालीन पुरुषांच्या पोशाख आणि ॲक्सेसरीज ब्रँड द बेअर हाऊसच्या सह-संस्थापकांनी - तन्वी आणि हर्ष सोमय्या - यांनी शार्क नमिता थापरकडून ३ कोटींची गुंतवणूक मिळवली आहे. व्यवसाय वाढवण्यात तज्ज्ञ असलेल्या एमक्युअर फार्मास्युटिकल्सच्या कार्यकारी संचालक नमिता यांच्या गुंतवणूक करारात १% इक्विटी स्टेकसाठी १ कोटी आणि कर्ज म्हणून २ कोटींचा समावेश आहे. या भागात, ज्यामध्ये शार्क नमिता थापर, अनुपम मित्तल, अमन गुप्ता, विराज बहल आणि कुणाल बहल होते, या जोडप्याने द बेअर हाऊसची नफाक्षमता, स्केलेबिलिटी आणि उत्पादन ऑफरिंगजने परीक्षकांना प्रभावित केले. शार्क अमनने ब्रँडचे वर्णन 'खरे असण्यास खूपच चांगला' असे केले. शार्क कुणाल बहलनेही रस दाखवला आणि १०० कोटी मूल्यांकनावर ३% इक्विटी स्टेकसाठी ३ कोटी गुंतवण्याची ऑफर दिली. हर्ष आणि तन्वी सोमय्या यांना वाटले की नमिता थापरची ऑफर त्यांच्या दृष्टिकोनाशी चांगली जुळते आणि त्यांनी दोन्ही शार्कमधून निवड करताना तिच्यासोबत पुढे जाण्याचा निर्णय घेतला.

# शहरात स्टडी स्मार्ट संस्थेच्या कार्यालयाचे २२ रोजी उद्घाटन




छत्रपती संभाजीनगर : स्टडी स्मार्ट, अग्रगण्य परदेश शिक्षण सल्लागार संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर येथे २२ मार्च २०२५ रोजी नवीन कार्यालयाचे भव्य उद्घाटन होणार आहे. उद्घाटनानंतर स्टडी अब्रॉड सेमिनार आणि समुपदेशन दिन आयोजित केला जाणार असून, जो परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवण्यात आले.

हा कार्यक्रम मोफत असून स्टडी स्मार्टच्या नवीन कार्यालयात २ रा मजला, लोया अव्हेन्यू, क्रांती चौक सर्कल, छत्रपती संभाजीनगर, सकाळी ११ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत होणार आहे. येथे विद्यार्थी आणि पालकांना प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ चेतन जैन, लीना मोहिले, जोहेब सय्यद आणि विनिशा चव्हाण यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळेल आणि जागतिक शिक्षणाच्या संधींबद्दल सखोल माहिती मिळेल.

या सेमिनारमध्ये व्यक्तिगत समुपदेशन, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आर्थिक मदतीचे पर्याय, पार्ट-टाइम नोकऱ्या आणि परदेशातील निवास व्यवस्थेची माहिती दिली जाईल. तसेच, विद्यार्थी आणि पालकांना नोकरीच्या संधी आणि करिअर ग्रोथ विषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळेल.

**MUNICIPAL COUNCIL ERANDOL, DIST.-JALGAON**

Contact No.: 02588-245022 (Chief Officer/President) : 02588-244401(Office)
Fax No. : 02588-243067
E-Mail : mnc_erl.001 @rediffmail.com / mcerandol@gmail.com
Add : Main Road, Erandol, Dist.-Jalgaon (Maharashtra) 425109

**O/w No./PWD/32/2024-25** **Dated: 18/03/2025**

**(OPEN TENDER NOTICE)**

**1.** Refer to open tenders Id 2025_DMA_1162094_1 published on 19th March, 2025.
**2.** Please visit the website at **https://mahatenders.gov.in** for further details.
**3.** Due date for submission of quotation and opening of tenders is amended as follows:

| | | |
|---|---|---|
| Due date of submission of Quotations | 03/04/2025 | Time: 12.00 PM (IST) |
| Pre-Bid Meeting | 28/03/2025 | Time: 11.00 AM (IST) |
| Opening of Tenders | 04/04/2025 | Time: 12.00 PM (IST) Onwards |

**4.** Attendance of bidders should be compulsory at the time of Pre-bid meeting.
**5.** There are no other changes in the terms and conditions of the open tender notice.

**(Amol Prabhakar Bagul)**
**Chief Officer And Administrator**
Municipal Council Erandol
Dist.-Jalgaon

**Format C-7**

(for political parties to publish in the newspapers, social media platforms & website of the party)

Information regarding individuals with pending criminal cases, who have been selected as candidates, along with the reasons for such selection, as also as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates.

(As per the Commission's directions issued in pursuance of the Order dated 13.02.2020 of the Hon'ble Supreme Court in contempt petition(C) no. 2192 of 2018 in WP(C) no. 536 of 2011)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of the Election : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members**

**Name of State/UT : Maharashtra**

**(1) Name of the Constituency : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members**

**Name of the candidate : SANJAY KISHANRAO KENEKAR**

| Sl. No. | | | |
|---|---|---|---|
| | | **Criminal antecedents** | |
| 1 | a. | Nature of the offences | 1. FIR/291/2020 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188,269 r/w 34 IPC<br>2. FIR No. 79/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188 IPC<br>3. FIR No. 573/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188, 269, 270 IPC<br>4. FIR No. 654/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 269, 270 IPC<br>5. FIR No. 192/2021 MIDC CIDCO Police Station Aurangabad U/s 143, 188, 269, 270 IPC. Disaster Management Act 51-b<br>6. FIR No. 30/2022 Pundlik Nagar Police Station Aurangabad U/s 269, 270 r/w 34 IPC<br>7. FIR No. 154/2021 Pundlik Nagar Police Station Aurangabad U/s 143, 188, 269, 270 IPC<br>8. FIR No. 450/2020 City Chowk Police Station Aurangabad U/s 143, 188, 269 Of IPC U/s. 59 of Disaster Management Act<br>9. FIR No. 78/2021 MIDC Waluj Police Station Aurangabad U/s 143, 147, 186, 188 of IPC<br>10. FIR No. 671/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 269, 270 of IPC |
| | b. | Case no. | 1. SCC No. 9434/2020<br>2. SCC No. 7844/2021<br>3. SCC No. 1688/2022<br>4. SCC No. 7674/2022<br>5. SCC No. 2218/2022<br>6. SCC No. 1450/2023<br>7. SCC No. 7859/2021<br>8. SCC No. 336/2021<br>9. SCC No. 1479/2021<br>10. SCC No. 4919/2023 |
| | c. | Name of the Court | 1. XXth, J.M.F.C. Aurangabad<br>2. IXth, J.M.F.C. Aurangabad<br>3. IXth, J.M.F.C. Aurangabad<br>4. IXth, J.M.F.C. Aurangabad<br>5. XX, J.M.F.C. Aurangabad<br>6. XXIIth, J. M.F.C Aurangabad<br>7. XXIIth, J.M.F.C. Aurangabad<br>8. XXIIth J.M.F.C. Aurangabad<br>9. IXth, J.M.F.C. Aurangabad<br>10. Matter IXth, J.M.F.C. Aurangabad |
| | d. | Whether charges have been framed or not (Yes/No) | No |
| | e. | Date of conviction, if any | NIL |
| | f. | Details of punishment undergone, if any | NIL |
| | g. | Any other information required to be given | The Case is still under consideration before Hon'ble Court. |
| 2 | | The reasons for the selection of the candidate. Selection shall be with reference to the qualifications, achievements and merit of the candidate, and not mere "winnability" at the polls (not more than 100 words) | Candidate **Sanjay Kishanrao Kenekar** has been Senior Social Worker. He has very strong administrative capacity. Looking at his experience he has been chosen. |
| 3 | | Reasons as to why other individuals without criminal antecedents could not be selected as candidates (not more than 100 words) | All other names who were, aspirants did not have any relevant experience in public life to holds such senior post. |

**(1) Name of the Constituency : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members**

**Name of the candidate : SANJAY KISHANRAO KENEKAR**

**Date : 18/03/2025**
**Place : Mumbai**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## अग्रलेख...

# शक्तीचे विश्वरूप दर्शन!

सहा वर्षांपूर्वीच्या लोकसभा निवडणूक निकालाच्या सहा दिवस अगोदर, १७ मे २०१९ या तारखेस दिल्लीच्या माध्यमविश्वात दुपारनंतर एक बातमी झपाट्याने पसरली. भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय कार्यालयात होणाऱ्या पत्रकार परिषदेस पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार हे कळताच, राजधानीतील माध्यमविश्वाच्या आणि राजकीय वर्तुळातील अनेकांच्या भुवया उंचावल्या. त्याआधीच्या पाच वर्षांतपंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत एकदाही पत्रकार परिषदेस सामोरे न गेलेले नरेंद्र मोदी माध्यमांसमोर येणार, या कल्पनेने त्यांना खिंडीत गाठण्याचीही आखणी सुरू झाली. त्याच दिवशी मोदी यांच्या उपस्थितीत होणाऱ्या पत्रकार परिषदेच्या काही मिनिटे अगोदर, काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष राहुल गांधी यांनीही तातडीने पत्रकार परिषद घेतली. ती पत्रकार परिषद संपली आणि भाजपाच्या केंद्रीय कार्यालयातील ही पत्रकार परिषद सुरू झाली. पक्षाध्यक्ष अमित शाह यांच्यासोबत पंतप्रधान मोदी स्थानापन्न झाले. दोघांनीही आपले प्रास्ताविक मनोगत मांडले आणि प्रश्नोत्तरांचा सिलसिला सुरू झाला. त्यात गैर काहीच नव्हते. पण भाजपाच्या पत्रकार परिषदेचे काही संकेत असतात. पक्षाच्या संघटनात्मक स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या त्या पत्रकार परिषदेत बहुधा प्रथमचत्या संकेतांची जाणीव माध्यमांना झाली. मोदी यांच्या रोखाने आलेला एक प्रश्न त्यांनी तेव्हाचे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांच्याकडे हस्तांतरित केला, तेव्हाच्या त्यांच्या उद्‌गारांनी पत्रकारांना बहुधा प्रथमच, भाजपाच्या पठडीची जाणीव झाली. ''मै तो पार्टी का एक अनुशासित सिपाही हूँ, हमारे यहाँ अध्यक्षजी ही सबकुछ होते हैं'' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उत्तराने पत्रकार परिषदेचा सारा नूरच पालटून गेला आणि पत्रकारांचे प्रश्न मोदींकडे न वळताही, त्या दिवशीची बातमी मात्र मोदी यांच्या या उत्तरामुळेच माध्यमांना मिळाली. त्याआधीच्या पाच वर्षांत एकदाही आणि पंतप्रधानपदाच्या पहिल्या पर्वातील कारकीर्दीच्या अखेरच्या टप्प्यातही, माध्यमांना सामोरे न जाण्याच्या मोदी यांच्या कृतीचे माध्यमांनी तेव्हा अनेक अर्थ काढले होते. काही अफवादेखील माध्यमविश्वात पसरविल्या गेल्या. मात्र, पंतप्रधानपदाच्या पहिल्या दिवसापासून मोदी यांनी माध्यमांच्या अफवा आणि शंकांचे निरसन करण्यासाठी पत्रकार परिषदा घेतल्या नाहीत. केवळ माध्यमेच नव्हे, तर विरोधकांनी हरतऱ्हेचे आरोप करूनही वैयक्तिक टीकेची झोड उठवूनही, वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरून मोदींना अंगावर घेण्याचा प्रयत्न करूनही देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकदाही त्याला प्रत्युत्तर दिले नाही. देश-विदेशात सभा गाजविणाऱ्या, आपल्या विचार आणि वाणीने श्रोत्यांना मुग्ध करणाऱ्या आणि कृतिशीलतेने नेतृत्वगुण सिद्ध करणाऱ्या या नेत्याने असे का केले असावे? तो खरेच त्यांचा दुबळेपणा होता की ती पक्षाची, पक्षासाठी, मोदी-शाह यांनी जाणीवपूर्वक आखलेली नीती होती? मोदींना पराभवाची चाहूल लागली असावी, असाही तर्क काही माध्यमांनी लढविला. मोदी यांच्या प्रत्येक कृतीचे अर्थ लावताना राजकीय विश्लेषक म्हणविणाऱ्यांची तर दमछाक झालीच; पण विरोधी पक्षांना स्वतःचा अजेंडा ठरविण्याचाही विसर पडला. मोदी नावाच्या गारुडामागे आपली फरफट होत असूनही आणि हाती काहीच लागत नाही हे माहीत असूनही सारेजण मोदींच्या कृती आणि वर्तणुकीचे अर्थ लावण्यातच गर्क राहिले. मोदी यांच्या उपस्थितीत भारताच्या राजधानीमध्ये झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या त्या बहुधा पहिल्याच पत्रकार परिषदेस आता जवळपास सहा वर्षे उलटून गेली आहेत. गेल्या ११ वर्षांच्या पंतप्रधानपदाच्या कारकीर्दीत मोदी यांनी प्रसार माध्यमांचा वापर न करता 'मन की बात'सारख्या उपक्रमातून, जाहीर सभांतून आणि सार्वजनिक संवादाच्या अन्य माध्यमांद्वारे देशातील जनतेशी थेट संवाद साधला आणि माध्यमांना डावलूनदेखील जनतेशी संपर्क राखता येतो, एवढेच नव्हे, तर या संपर्काद्वारे जनतेच्या भावना जाणूनही घेता येतात, हे मोदी यांनी सिद्ध करून दाखविले आहे. झपाट्याने जनमानसावर प्रभाव टाकण्याकरिता माध्यमांची गरज राजकीय वर्तुळात स्पष्ट झालेली असतानाही, पत्रकार परिषदांमार्फत जनतेशी संवाद माध्यमांचा वापर न करण्याच्या त्यांच्या या प्रयोगावर अजूनही देशातील माध्यमविश्वात अधूनमधून नाराजी व्यक्त होत असते. पंतप्रधान मोदी यांच्या या नीतीला अपेक्षित यश मिळताना दिसत आहे. भारताच्या भविष्यातील वाटचालीसाठी त्यांनी जे काही संकल्प जाहीर केले आहेत, त्याच्या यशाचे मूल्यमापन आजकाल आंतरराष्ट्रीय माध्यमविश्वाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर होत असल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणातील देशाची प्रतिष्ठाआणि महत्त्व वाढविण्याच्या ध्येयाची अनुकूल फळे आता मिळू लागली आहेत, असे म्हणता येईल.

अमेरिकेतील प्रसिद्ध पॉडकास्टर लेक्स फ्रिडनमन यांच्या पॉडकॉस्टकरिता पंतप्रधान मोदी यांनी दिलेली तब्बल तीन तासांची प्रदीर्घ मुलाखत रविवारी प्रसृत झाली. जागतिक राजकारणाच्या पटलावर या मुलाखतीची चर्चा सुरू असून देश-विदेशातील अनेक माध्यमांची आज मोदी यांच्या राजनीतीचे विश्लेषण करताना एक जुन्या भारतीय लोककथेतील सहा आंधळ्यांसारखी स्थिती झालेली दिसत आहे. एक संपूर्ण हत्ती कसा असतो हे लक्षात न आल्याने ज्यांना जसा भासला तसा हत्ती असतो, असा तर्क लढविणाऱ्या त्या गोष्टीतील सहाजणांमध्ये अखेर हत्तीच्या एकूण स्वरूपाविषयी एकमत झालेच नाही. मोदी यांच्या राजनीतीची उकल करतानाही अशीच काहीशी स्थिती झालेली दिसते. या पॉडकास्टवरील मुलाखतीत मोदी यांनी व्यक्तिगत जडणघडण, जीवनातील आदर्श, संस्कार, वाटचाल यांविषयीच्या अनेक उत्सुकतांची पुन्हा एकदा सविस्तर उकल केलीच; पण भारताचा पंतप्रधान म्हणून देशाच्या हिताचा विश्वस्त या नात्याने भारतीय जनजीवनाशी संबंधित असलेल्या सर्व समस्यांची नेमकी जाणीवही दाखवून दिली. चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांसोबत असलेल्या भारताच्या सध्याच्या आणि परंपरागत संबंधांचे अनेक पदर राजनैतिक चातुर्याने उलगडताना या देशांसोबतच्या भावनिक बंधनांची जाणीव त्यांनी जाणीवपूर्वक उघड केली. चीन हा देशाचा राजनैतिक स्पर्धक असला, तरी या देशासोबत भारताचे प्रदीर्घ सांस्कृतिक संबंध आहेत आणि त्यापैकी काही संबंधांचे धागे भावनिकदृष्ट्या परस्परांशी जोडले गेले आहेत, याचे त्यांनी विशद केलेले नेमके वास्तव त्यांच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील परस्पर संबंध जोडण्याच्या आणि जागतिक शांततेसाठी भारताच्या भूमिकेच्या आग्रही राजनीतीस साजेसेच ठरले आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांच्या काही परराष्ट्र धोरणांमुळे जगातील अनेक देशांत संभ्रम आणि काहीसे अस्थिरतेचेही वातावरण पसरले आहे. पण प्रत्येक राष्ट्रप्रमुखाने अगोदर आपल्या देशाच्या हिताचा विचार करणे ही आदर्श राजनीती असतेच. ट्रम्प यांच्या अमेरिका फर्स्ट या धोरणाप्रमाणेच भारताचे हित जपणे ही आपलीदेखील सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे, असे सांगताना त्यांनी ट्रम्प यांच्या धोरणाची स्तुती केली असली, तरी भारताच्या हिताबाबत कोणतीही तडजोड नाही, याची अप्रत्यक्षपणे जाणीवही या माध्यमाच्या मंचावरून आंतरराष्ट्रीय समुदायास करून दिली आहे. पाकिस्तानशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याच्या भारताच्या प्रत्येक प्रामाणिक प्रयत्नास पाकिस्तानकडून सातत्याने शत्रुत्व आणि विश्वासघाताचेच उत्तर मिळाले, हेदेखील मोदी यांनी अधोरेखित केल्याने जागतिक मंचावर पाकिस्तानविषयक चर्चेतील भारताच्या भूमिकेचा पायाही मोदी यांनी या निमित्ताने भक्कम केला आहे.

मोदी ही व्यक्ती नाही, तर या देशाची हजारो वर्षांची सांस्कृतिक परंपरेचे, १४० कोटी लोकसंख्या असलेल्या सामर्थ्याचे प्रतिनिधित्व आहे, ही त्यांची भूमिका देशाची प्रतिष्ठा उंचावण्याच्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांस साजेशी आहे. भारत हा एक असा देश आहे, ज्याच्या इतिहासात धार्मिक, राजकीय, सामाजिक तणावाचे अनेक प्रसंग घडले आहेत. या इतिहासाचा, वर्तमानाचा आणि भविष्याचाही व्यापक परामर्श घेणाऱ्या या मुलाखतीचा धांडोळा घेताना, त्या लोककथेतील सहा आंधळ्यांना हत्तीचे संपूर्ण रूप अनुभवता आले की नाही, याचे उत्तरही शोधता येऊ शकते.

## आंतरराष्ट्रीय

वसंत गणेश काणे

# ट्रम्प यांचे स्वप्न बृहन् अमेरिकेचे

लेखांक ४ था

पिरिऑडिक टेबलमध्ये मूलद्रव्यांचा एक गट असा आहे की, ज्यांना 'रेअर एलिमेंट्स' असे म्हणतात. अल्प प्रमाणात आढळणारी ही मूलद्रव्ये आज वीज, प्रकाश आणि चुंबकत्व यावर आधारित उपकरणांमध्ये वापरली जातात. ती वजनाने हलकी आणि आकाराने लहान असतात. यांच्या खनिजांमध्ये विविध रंग, काठिण्य, चमक, घनत्व आणि विविध प्रकारची स्फटिके आढळतात. चीनमध्ये ४४ मिलियन मेट्रिक टन (१ मेट्रिक टन = १००० किलो ग्रॅम) वजनाची रेअर एलिमेंट्स आहेत तर ब्राझीलमध्ये ती २१ आणि भारतात ६.९ मिलियन मेट्रिक टन आहेत. पुढे अशाच उतरत्या क्रमाने आणखी ९ देशांचा क्रम आहे. युक्रेनमध्ये त्यापैकी २२ खनिजांच्या खाणी आहेत. त्यापैकी काही तर विशेषातली विशेष मानली जातात. ती अशी आहेत- १) ग्रॅफाईट : हा कर्बाचा प्रकार असून उष्णता आणि विजेचा वाहक आहे. २) लिथियम : नरम, चांदीप्रमाणे दिसणारे हलके आणि रासायनिकदृष्ट्या अतिशय क्रियाशील आहे. ३) टिटॅनियम : हलके, मजबूत आणि न जंगणारे आहे. ४) झर्कोनियम : मजबूत आणि न जंगणारे आहे. ५) बेरिलियम : मजबूत, हलके आणि उष्णतारोधक आहे.

रशियाबरोबरच्या युद्धात अमेरिकेने गेल्या तीन वर्षात युक्रेनला भरपूर सैनिकी साहित्य साह्य म्हणून दिले आहे. त्याची परतफेड युक्रेनने या रेअर एलिमेंट्सच्या स्वरूपात करावी, अशी डोनाल्ड ट्रम्प यांची अपेक्षा आहे. मदत नक्की किती दिली आणि त्या मोबदल्यात अमेरिकेला उत्खननाचे अधिकार किती द्यायचे, या विषयाबाबतचा खल पूर्ण होण्याअगोदरच रशियाने एक चतुर खेळी केली आहे. युक्रेनचा खनिजयुक्त २० टक्के भाग आजच रशियाच्या ताब्यात आहे. यापैकी काही खनिजयुक्त भागावर अमेरिकेला मालकी हक्कच रशियाने देऊ केले आहेत. हे हलवायाच्या घरावरील तुळशीपत्र असले, तरी आंतरराष्ट्रीय डावपेचातील ही एक अत्यंत चतुर खेळी मानली जाते. अमेरिकेच्या युक्रेनविरोधातील भूमिकेला युरोपियन युनियनचा विरोध आहे. अशाप्रकारे युरोप अमेरिकेपासून दुरावत चालला आहे. अमेरिका-रशिया यांच्यातील या मैत्रीला प्रासंगिकतेची किनार आहे. तिच्या मागची प्रेरणा उभयपक्षी स्वार्थ साधण्याचीच आहे. हा व्यवहार फक्त नफाकेंद्री सौदाच ठरतो. अमेरिका आणि युरोप यातील संबंधाला लोकशाहीचा तात्त्विक आधार होता. अमेरिकेची आर्थिक दहशत लक्षात घेता कोणीही उघडपणे त्यांच्यावर टीका करण्याचे टाळेल. पण यानंतर अमेरिकेपासून केवळ युरोपियनच नव्हेत तर आशियातील मित्र देश दुरावण्यास सुरुवात होईल, अशी शक्यता आहे. ट्रम्प नीती तर अमेरिकेला शापच ठरण्याची शक्यता अभ्यासकांना वाटते आहे; पण दुसरीही शक्यता नाकारता येत नाही. आज जगतातील रेअर अर्थच्या पुरवठा शृंखलेवर चीनचे प्रभुत्व (६६ टक्के) आहे. उद्या अमेरिका, रशिया आणि युक्रेन यात काही तडजोड झालीच आणि ती कितीही अल्पकाळ टिकली तरी तेवढ्या पुरता का होईना, पण चीनसमोर एक मोठा प्रतिस्पर्धी उभा राहू शकेल. खनिजांचा नुसता साठा असून उपयोगाचे नाही. तो खाणीतून बाहेर काढून त्याचे शुद्धीकरण करणे आणि कचऱ्याची विल्हेवाट लावणे ही मोठ्या खर्चाची कामे आहेत. रेअर अर्थ मिनेरल्स डील या नावाने अमेरिका आणि युक्रेन यात करार व्हावा, असे ठरले होते. पण झेलेन्स्की आणि ट्रम्प यात उडालेल्या खटक्यामुळे या सर्वावर पाणी पडले. कराराच्या अटी युक्रेनसाठी खूपच कडक होत्या. खनिजांचे उत्पादन, तेल, वायू आणि पायाभूत सोयीसुविधा (इन्फ्रास्ट्रक्चर) यापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील निम्मी रक्कमही अमेरिकेला मिळणार होती. म्हणजे युक्रेनच्या एकूण उत्पन्नापैकी निम्मी रक्कम अमेरिकेकडे वर्ग झाली असती. म्हणून झेलेन्स्की यांनी वाटाघाटीत ताणून धरले आणि त्यामुळे अमेरिकन संतापले आणि वाटाघाटी फिसकटल्या. आता ३० दिवसांच्या युद्धबंदीसकट युक्रेनने अमेरिकेच्या अटी मान्य केल्या आहेत. रशियाही काही मुद्दे सोडल्यास युद्धबंदीसाठी तयार आहे. युद्धबंदीच्या काळात गोदामे दारूगोळ्यांनी भरली जाऊ नयेत तसेच जवानांची नवी कुमक तयार केली जाऊ नये, अशा रशियाच्या अपेक्षा आहेत. एक मात्र खरे की, अमेरिकेच्या सर्व मागण्या मान्य केल्यानंतरही अमेरिका युक्रेनच्या सुरक्षेची हमी देण्यास मात्र तयार नाही. युक्रेनवासीयांच्या येत्या १० पिढ्या परतफेडीच्या चरखात कुस्करल्या जातील, अशी झेलेन्स्की यांना शंका येत होती म्हणून वाटाघाटी पुढे सरकत नव्हत्या आणि आपला प्रस्ताव अव्हेरला जातो आहे, हे पाहून अमेरिकेच्या रागाचा पारा वरवर चढत होता. याचा कळस काय झाला ते सर्व जगाने पाहिले आहे. अर्थात तो आज इतिहास झाला आहे. रेअर अर्थ मिनेरल्सच्या खनिजांवरच युक्रेन वसला आहे, असे म्हटले तरी चालेल. लिथेनियम आणि टिटॅनियमच्या प्रचंड साठ्यांचा हिशेब तर, आजही पूर्णपणे लागलेला नाही. लँथॅनम आणि सेरियम यांचा वापर टीव्ही आणि प्रकाश निर्मितीसाठी आवश्यक आसतो. निओडिमियमचा वापर पवनचक्क्या, ईव्ही बॅटरीजमध्ये केला जातो. एर्बियम आणि ईट्रियम यांची आवश्यकता अणुऊर्जा प्रकल्पांना आणि लेझर किरणांसाठी असते. स्कँडियमचे साठेही युक्रेनमध्ये आहेत, पण याबाबतचा तपशील अजून तरी एक खास गुपित आहे, असे म्हणतात. या सर्वांचे मूल्य निदान १२ ट्रिलियन डॉलर इतके तरी नक्कीच आहे. ही खनिजे विद्युत उपकरणे, स्वच्छ (क्लीन) ऊर्जा आणि लष्करी साहित्य निर्मिती यांच्यासाठी अतिशय मोलाची असल्याचे सिद्ध झाले आहे. आज रशियाने युक्रेनचा जो भाग (ल्युहॅन्स्क, डॉनेस्तक आणि जॅपोरिझिया हे प्रांत) जिंकलेला आहे; त्यात युक्रेनमधील खनिजांचा मोठा वाटा आहे. तो सोडायला रशिया तयार नाही. युक्रेनजवळ कुशल आणि स्वस्त मनुष्यबळ आहे. पायाभूत सोयीसुविधांचे जाळे आहे. पण प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्यापूर्वी कुणालाही अनेक वर्षे तरी नुसता खर्चच करावा लागणार आहे. अमेरिका आणि युक्रेन यातली पडद्याआडची बोलणी थांबली नव्हती. 'शांतता असावीशी वाटेल तेव्हा झेलेन्स्की पुन्हा वाटाघाटीसाठी येऊ शकतात', हे ट्रम्प यांचे वाटाघाटी मोडल्यानंतरचे नवे निमंत्रण अर्थगर्भ होते, ती केवळ औपचारिकता नव्हती. 'वाटाघाटी पुन्हा सुरू करा' असा अमेरिकन कंपन्यांचा दबाव ट्रम्प प्रशासनावर दिवसेंदिवस वाढत होता. झेलेन्स्की यांनी नुकतीच ट्रम्प यांची माफी मागितली आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी वाटाघाटी फिसकटल्यानंतर अमेरिकेकडून युक्रेनला रशियाविरोधात जी लष्करी मदत दिली जात होती, ती रोखली होती. यामुळे युक्रेनला तत्काळ अडचण भासणार नव्हती. दुसरे असे की, युरोपियन युनियन, ब्रिटन, जर्मनी, जपान आदी देश युक्रेनला मदत चालूच ठेवणार होते. आजवर युक्रेनला मिळालेली एकूण मदत १३० बिलियन युरो आहे. पण यापैकी एकट्या अमेरिकेचीच मदत ६४ बिलियन युरो इतकी होती. ती युक्रेनला कोणत्याही परिस्थितीत हवीच आहे. म्हणूनच आता युक्रेनचे पंतप्रधान डेनिस श्मीगल यांनी पुढाकार घेत सपशेल लोटांगण घातले आहे. उद्या असा करार झाला तरी सुरक्षेची हमी मिळाल्याशिवाय कोणतीही कंपनी युक्रेनमध्ये प्रवेश करणार नाही. आजतरी ही हमी फक्त अमेरिकेकडूनच मिळू शकते. ही हमी द्यायला अमेरिका आज तयार नाही. घोडं इथं अडलं आहे.

९४२२८०४४३०

## वेध

चंद्रकांत लोहाणा

# पुनरागमन राखीचे

ज्या एका भारतीय अभिनेत्रीने प्रेक्षकांच्या मनावर तब्बल चार दशके राज्य केले, ती अभिनेत्री राखी पुन्हा एकदा रुपेरी पडद्यावर दिसणार आहे. १९६७ मध्ये सिनेजगतात पदार्पण केल्यानंतर २००३ पासून यांनी सिनेसृष्टीला रामराम ठोकला. एकाकी जीवन जगणाऱ्या राखीचे पुनरागमन ही त्यांच्या चाहत्यासाठी एक आनंदवार्ता आहे. या आधुनिकतेच्या काळामध्ये सिनेमाचा अवतार पूर्णपणे बदललेला आहे. आजच्या युवा पिढीला राखी ही अनोळखी असली, तरी आजमितीस वार्धक्याकडे झुकलेल्या सिनेरसिकांना त्यांच्या उमेदीच्या काळातली राखी ही अभिनेत्री चांगलीच आठवत असेल. राखी या मूळच्या पश्चिम बंगालच्या असल्या, तरी त्यांनी बंगाली चित्रपटासह अनेक हिंदी चित्रपटांमध्ये कामे करून आपली कारकीर्द गाजविली आहे. त्यांचा जन्मही भारतीय स्वातंत्र्य दिनी झालेला. राखी यांचा प्रथम विवाह बंगाली चित्रपट दिग्दर्शक अजय बिस्वास यांच्याशी झाला होता. परंतु, हा विवाह लवकरच मोडीत निघाला. त्यानंतर त्यांनी सुप्रसिद्ध सिने गीतकार गुलजार यांच्याशी विवाह केला.हा विवाहसुद्धा जेमतेम एक वर्षच चालला. लग्नानंतर चित्रपटात काम करायचे नाही, असे गुलजार यांचे म्हणणे होते. मात्र, राखी यांनी पुन्हा चित्रपटात काम करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांच्यात खटके उडू लागले. राखीने १९७० ते १९९५ या कालावधीत अनेक चित्रपटांमध्ये काम केले. त्यांचे अनेक चित्रपट चर्चेमध्ये राहिले आहेत.



चित्रपटांतून राखी यांनी केलेली प्रत्येक भूमिका आजही सिनेरसिकांच्या मनामध्ये कोरली गेली आहे. १९७२ मध्ये के. शंकर दिग्दर्शित आणि सुरींदर कपूरद्वारा निर्मित 'शहजादा' हा चित्रपट त्यांचा फार गाजला. राजेश खन्ना आणि राखी यांच्या प्रमुख भूमिका असलेला हा चित्रपट १९६३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'इधू साथियम' या तामिळ चित्रपटाचा रिमेक होता. या चित्रपटातील राखीच्या भूमिकेला तेव्हा समीक्षक आणि प्रेक्षकांनी मनमोहक अभिनयाचा दर्जा दिला होता. १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या समीर गांगुली दिग्दर्शित आणि सुबोध मुखर्जी निर्मित 'शर्मिली' या चित्रपटामध्ये राखीने दोन प्रमुख भूमिका साकारल्या होत्या. या चित्रपटाच्या यशामुळे ८० च्या दशकामध्ये राखी या आघाडीच्या अभिनेत्रीमध्ये गणल्या जाऊ लागल्या. १९७१ मध्येच प्रदर्शित 'लाल पथ्थर' हा चित्रपटही त्यांच्या अभिनयामुळे चांगलाच गाजला. १९६४ च्या 'लाल पथ्थर' या बंगाली चित्रपटाचा हा रिमेक असून राजकुमार, राखी, हेमामालिनी, विनोद मेहरा व अजित यांनी या चित्रपटामध्ये प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटामध्ये 'राणी' या भूमिकेने चांगलीच वाहवा मिळविली होती. १९७६ च्या 'कभी कभी' मधील भूमिकेने राखीला यशाच्या उत्तुंग शिखरावर पोहोचविले. यश चोप्राद्वारा दिग्दर्शित या चित्रपटामध्ये राखीसह अमिताभ बच्चन, शशी कपूर, वहिदा रहमान, ऋषी कपूर व नीतू सिंह यांच्या प्रमुख भूमिका होत्या. या चित्रपटामधील स्व. मुकेशद्वारा गायिलेले 'कभी कभी मेरे दिलमें खयाल आता है...' या गीताने तेव्हा सर्व विक्रम मोडीत काढले होते. त्या दशकामध्ये सर्वाधिक कमाई करणारा हा चित्रपट ठरला. त्यानंतर १९९५ मध्ये राकेश रोशन निर्मित व दिग्दर्शित 'करण अर्जुन' या चित्रपटामधील राखीने वठविलेली आईची भूमिका अजूनही प्रेक्षकांच्या स्मरणात आहे. या ॲक्शन चित्रपटाची कथा दोन नावाजलेल्या भावंडाभोवती फिरणारी असून आपल्या वडिलाच्या हत्येचा बदला घेण्यासाठी हे दोघे भाऊ पुनर्जन्म घेतात. या दोन्ही मुलाची आई राखीने दुर्गाच्या रूपामध्ये उत्तम साकारली आहे. १९८९ मध्ये आलेल्या 'राम लखन' या चित्रपटातील राखीची सहायक अभिनेत्रीची भूमिकाही चांगलीच वाखाणली गेली. अंगारे, दूसरा आदमी, श्रीमान श्रीमती हेही चित्रपट त्याच श्रेणीतले. आपल्या उमेदीच्या काळामध्ये राखीनेअनेक भूमिकांसाठी पुरस्कार मिळविले. १९७३ मध्ये प्रदर्शित 'दाग अ पोन ऑफ लव्ह' या चित्रपटातील सहायक अभिनेत्रीचा फिल्मफेअर पुरस्कार, १९७४ मध्ये प्रदर्शित '२७ डाऊनमधील' भूमिकेसाठी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, १९७६ मध्ये 'तपस्या' चित्रपटातील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा फिल्मफेअर पुरस्कार, १९८९ मध्ये 'राम लखन' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्रीचा फिल्मफेअर पुरस्कार, २००३ साली बंगाली चित्रपट 'शुभो महूर'साठी सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्रीचा पुरस्कार व याच वर्षी त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. त्याचमुळे राखीचे पुनरागमन हे स्वागतार्ह ठरावे.

९८८१७१७८५६

## प्रासंगिक

पंकज जगन्नाथ जयस्वाल


# स्टार्टअप इंडिया : नवोन्मेषाला चालना

जेव्हा तरुणांची मानसिकता आणि सरकारी धोरणे नोकरी शोधणाऱ्यांपेक्षा रोजगार निर्माण करणाऱ्यांना प्राधान्य देतात तेव्हा देशाचा सर्वांगीण विकास होतो. मोदी सरकार गेली दहा वर्षे विविध कार्यक्रम आणि धोरणांच्या माध्यमातून हेच करत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया आणि इतर तत्सम धोरणे तरुणांच्या संशोधन आणि नावीन्यपूर्ण प्रतिभा, ज्ञान, कौशल्ये आणि उद्योजकता विकसित करण्यासाठी स्थापन करण्यात आले आहेत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली गेल्या नऊ वर्षांत स्टार्टअप इंडिया उपक्रम कसा विकसित झाला आहे ते पाहूया.

भारत स्टार्टअप इंडियाची नऊ वर्षे साजरी करत आहे, २०१६ मध्ये सुरू झालेला परिवर्तनाचा प्रवास. राष्ट्रीय स्टार्टअप दिवस उद्योजकता आणि सर्वसमावेशक व्यवसाय परिसंस्थेच्या प्रगतीमध्ये देशाच्या प्रगतीचा उत्सव साजरा करतो. भारत सरकारचा प्रमुख उपक्रम म्हणून सुरू करण्यात आलेल्या स्टार्टअप इंडियाचे उद्दिष्ट सर्जनशीलता वाढवणे आणि देशभरातील उद्योजकांच्या वाढीला गती देणे हे आहे.

१५ जानेवारी २०२५ पर्यंत डिपार्टमेंट फॉर प्रमोशन ऑफ इंडस्ट्री ॲण्ड इंटरनल ट्रेडद्वारे मान्यताप्राप्त १.५९ लाख कंपन्यांसह, भारताने जगातील तिसरी सर्वांत मोठी स्टार्टअप इकोसिस्टम म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे. १०० हून अधिक युनिकॉर्नच्या नेतृत्वाखालील ही मजबूत इकोसिस्टम जागतिक स्तरावर नावीन्य आणि उद्योजकतेची पुन्हा व्याख्या करत आहे. बंगळुरू, हैदराबाद, मुंबई आणि दिल्ली-एनसीआरसारख्या प्रमुख केंद्रांनी या बदलाचे नेतृत्व केले आहे, तर लहान शहरांनी देशाच्या उद्योजकता मोहिमेत वाढत्या प्रमाणात योगदान दिले आहे. फिनटेक, एडटेक, हेल्थ-टेक आणि ई-कॉमर्स स्टार्टअप्सनी जगभरात प्रसिद्धी मिळवण्यासाठी स्थानिक अडथळे दूर केले आहेत.

**स्टार्टअप इंडियाच्या प्रमुख उपलब्धी** : गेल्या नऊ वर्षांमध्ये, स्टार्टअप इंडिया उपक्रमाने देशातील मजबूत उद्योजकीय परिसंस्था विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. नवकल्पना आणि सर्वसमावेशकतेला प्रोत्साहन देऊन उपक्रमाने प्रचंड यश मिळवले आहे, जे भारतीय अर्थव्यवस्थेवर आणि समाजावर त्याचा सकारात्मक प्रभाव दर्शवते. डीपीआयआयटी मान्यताप्राप्त स्टार्टअप्सची संख्या २०१६ मध्ये सुमारे ५०० वरून १५ जानेवारी २०२५ पर्यंत १,५९,१५७ पर्यंत वाढली आहे. ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत, ७३,१५१ मान्यताप्राप्त व्यवसायांमध्ये किमान एक महिला संचालक होती, ज्यामुळे भारतातील महिला उद्योजकांच्या संख्येत वाढ झाली आहे. २०१६ ते ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत, मान्यताप्राप्त स्टार्टअप्सनी १६.६ लाखांहून अधिक थेट नोकऱ्या निर्माण केल्या, ज्यांनी रोजगार निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.




**स्टार्टअप इंडिया इनिशिएटिव्हचे ठळक मुद्दे**

**व्यवसाय करण्याची सुलभता** : सरलीकृत अनुपालन, स्वयं-प्रमाणीकरण आणि एकल-विंडो क्लीअरन्स उद्योजकांसाठी प्रक्रिया सुलभ करतात.

**कर लाभ** : पात्र स्टार्टअप्सना सलग तीन आर्थिक वर्षांसाठी कर भरण्यापासून सूट दिली जाते. स्टार्टअप्ससाठी १०,००० रुपये कोटींचा निधी सुरुवातीच्या टप्प्यात स्टार्टअप्सना वित्तपुरवठा करतो.

**क्षेत्र-विशिष्ट धोरणे** : जैवतंत्रज्ञान, कृषी आणि नवीकरणीय ऊर्जा यासारख्या क्षेत्रांमध्ये केंद्रित धोरणे लक्षित विकासाला चालना देतात.

**उद्योगनिहाय नोकऱ्या** : स्टार्टअप्स विशिष्ट उद्योगांमध्ये नोकऱ्या प्रदान करतात. आयटी सेवा उद्योग २.०४ लाख नोकऱ्यांसह आघाडीवर आहे, त्यानंतर आरोग्यसेवा आणि जीवनशास्त्र १.४७ लाख नोकऱ्या आणि व्यावसायिक सेवा ९४,००० नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. हे योगदान आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि उद्योगांमध्ये वैविध्यपूर्ण नोकरीच्या संधी प्रदान करण्यात स्टार्टअप्सचे महत्त्व अधोरेखित करते.

**स्टार्टअप इंडिया अंतर्गत इतर उपक्रम** : स्टार्टअप इंडिया प्रकल्प क्षमता वाढवणे, जागतिक स्तरावर पोहोच वाढवणे आणि परिसंस्थेतील सहभाग सुधारणे या उद्देशाने विविध उपक्रमांद्वारे व्यवसायांना समर्थन प्रदान करतो.

**आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि दुवे** : भारताच्या जी-२० अध्यक्षपदाने जागतिक आर्थिक सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्टअप २० सहभाग गटाची स्थापना केली. देशभरात झालेल्या बैठकांमध्ये भारताच्या प्रादेशिक स्टार्टअप परिसंस्थांवर प्रकाश टाकण्यात आला, ज्यामुळे जगभरात स्टार्टअप विषय योग्यरीतीने पोहोचला. सरकार-ते-सरकार संवाद, जागतिक मंचांमध्ये सहभाग, आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन आणि इतर देशांसोबत संबंध विकसित करणे या सर्व गोष्टींमुळे सीमापार सहकार्याला मदत झाली आहे.

**इकोसिस्टम सहकार्याला प्रोत्साहन देणे** : स्टार्टअप इंडिया हब पोर्टल उद्योजकीय इकोसिस्टमच्या भागधारकांसाठी संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म प्रदान करते. हे उपक्रमाद्वारे प्रदान केलेली संसाधने, माहिती आणि उपयोगिता प्रदान करते, स्टार्टअप्स आणि उद्योजकांसाठी प्रवेश वाढवून सर्वसमावेशकता सुनिश्चित करते, विशेषत: महानगर क्षेत्राबाहेर असणाऱ्या उद्योजकांसाठी.

**भास्कर** : भारताच्या स्टार्टअप इकोसिस्टमला सक्षम करणे

वरील उपायांव्यतिरिक्त, उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने सप्टेंबर २०२४ मध्ये भारत स्टार्टअप नॉलेज एक्सेस रजिस्ट्री (भास्कर) प्लॅटफॉर्म तयार केला. हा अत्याधुनिक उपक्रम, स्टार्टअप इंडिया कार्यक्रमाचा भाग आहे, भारताच्या उद्योजकीय परिसंस्थेतील संवाद मजबूत आणि सुव्यवस्थित करण्याचा प्रयत्न करतो. स्टार्टअप महाकुंभ हा एक प्रमुख उपक्रम आहे जो स्टार्टअप्स, युनिकॉर्न, सुनिकॉर्न, गुंतवणूकदार, उद्योग नेते आणि इकोसिस्टम पद्धतींना एकाच ठिकाणी एकत्र आणतो. हे भारताची उद्योजकता आणि तांत्रिक क्षमता हायलाईट करते, तसेच देशाच्या स्टार्टअप इकोसिस्टमच्या वाढीसाठी संवादाला प्रोत्साहन देते. २०२४ मधील उद्घाटन आवृत्तीने दहा वेगवेगळ्या थिमॅटिक पॅव्हेलियनमध्ये १,३०० हून अधिक प्रदर्शकांना आकर्षित करून एक उत्तम उदाहरण सेट केले. याने ४८,००० हून अधिक कॉर्पोरेट अभ्यागतांना आकर्षित केले आणि नावीन्यपूर्ण कल्पना आणि अर्थपूर्ण सहकार्यांसाठी ते डायनॅमिक मॅग्नेट बनले.

या परिषदेला युनिकॉर्नचे संस्थापक, दूरदर्शी, धोरणकर्ते आणि प्रभावकार, तसेच ५,००० प्रतिनिधी आणि २०० हून अधिक शीर्ष गुंतवणूकदार, उद्यम भांडवलदारांसह ३९२ प्रमुख वक्ते उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात भाग घेतला, उत्साहवर्धक भाषण केले. ३-५ एप्रिल २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे होणारी दुसरी आवृत्ती अपेक्षांपेक्षा जास्त कामगिरी करेल अशी अपेक्षा आहे.

७८७५२१२१६१

## वाचक पत्रे

### पंधरा वर्षांवरील वाहनांचे करायचे काय?

सध्या नवीन नंबर प्लेट बसवा अशी मोहीम सुरू आहे. २०१९ नंतरच्या वाहनांना कमी शुल्कात ती मिळणारच आहे, पण ज्या वाहनांना पंधरा, वीस, पंचेवीस वर्षे झाली परंतु अजूनही सुस्थितीत त्या आहेत, लोकांच्या उदरनिर्वाहासाठी उपयुक्त आहेत, त्यांची कागदपत्रे बरोबर आहेत अशांसाठी हा नियम खरे तर नको. कारण या नियमाखाली राज्य सरकार व परिवहन विभाग मोठा ग्रीन टॅक्स आकारणार, लोकांना नाहक हा भुर्दंड बसणार, हजारोने जमा झालेल्या गाड्यांचे करायचे काय? त्या कोण विकत घेणार? बरं घेणारा असेल तर किती किंमत देणार? नवीन गाडी घेण्यासाठी लाख रुपये सामान्य जनता कुठून आणणार? नागपूरातील प्रचंड उन्हाळ्यात नागरिकांना आरटीओच्या चकरा माराव्या लागणार आहे. कॉटन मार्केटमध्ये छोटे भाजी नेणारे वाहक तर हतबलच होतील. त्यांच्या पाच चाकी गाड्या कुठे ठेवणार, नवीन दोन लाख कोण देणार, दलाल हात धुऊन घेतील, चौकात मामांची चांदी होईल. हे असले नियम आणण्यामागे हेतू काय? अनेक छोट्या कुटुंबांनी जुन्या गाड्या ऑटो डीलमधून घेतल्या आहेत. त्या तशाच जुन्या आहेत. अशावेळी अकारण या नियमांतर्गत अनेक कुटुंबे एकतर रोजगारापासून वंचित राहतील अन्यथा कर्ज घेऊन गाड्या नाईलाजाने घेतील. शहरामध्ये सरकारने जुन्या गाड्यांना ठरवलेल्या किमतीत नंबर प्लेट द्याव्या परंतु त्यावर इतर टॅक्स जसे ग्रीन टॅक्स, पेनाल्टी वगैरे घेऊ नये तरचं लोक स्वखुशीने त्या लावतील.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

### धुळवड : काल आणि आजची

होळीनंतरचा दुसरा दिवस म्हंणजे धुळवडीचा. महाराष्ट्राच्या बाहेर रंगपंचमी म्हंणतात. ती दोन दिवस चालते. काही वर्षांपूर्वी होळीच्या रात्रीपासूनच वातावरण खूप खराब असायचे. मध्यरात्रीनंतरच आरडाओरडा करत कोणांला शिव्या देत टोळभैरव जायचे.सकाळी ते थोडे शांत असायचे.आम्ही दहा बारा मुलीं जवळच्याच मोहल्ल्यातल्या मागच्या अंगणात रंग खेळायचो.पिचकारीने किंवा बाटलीच्या झाकणाला छिद्र करून त्यातून रंग उडवायचा. थंडी वाजायला लागली की रंग खेळणे बंद होत असे.मुले बाहेर अंगणात, रस्त्यावर, मित्रांकडे जाऊन रंग खेळायचे. आम्ही वर्धेला होतो तेव्हा दुपारी नळ सुरू करायचे.विहीर किंवा नळाद्वारे पाणी मिळायचे. एकमेकांना गाठ्या घालायच्या.मग रंग काढायला कसरत करावी लागायची. मग भरपूर जेवण करून झोपायचे. दुपारी बारानंतर मग पुन्हा टोळभैरवांचे घोळके फिरायचे. तेव्हा दार बंदच ठेवायचे. कुठेही कोणी कोणाच्याही घरात शिरायचे.

पण आता या आठ दहा वर्षांत खूप बदल झाला आहे. बहुतेक सोसायटींमधून एकत्रच रंग खेळतात. अगदी संपूर्ण कुटुंबच असते.नाश्ता, जेवण सगळंच एकत्र होते. सकाळी दहापर्यंत तुम्ही तुमची बाहेरची कामे करू शकता. कोणी काही उगीचच रंग टाकणार नाही. पुन्हा संध्याकाळी सगळे सुरळीत व्यवहार सुरू होतात. पोलिस बंदोबस्तही चांगला असतो. ड्युटीवर जाणारे जाऊ शकतात. लहानपणी मोठे सिनेकलाकारांची धुळवडीची वर्णनं ऐकून हेवा वाटायचा.किती रंग असायचा त्यांच्याकडे. हौदात रंग केलेला दाखवायचे. पुन्हां कोरडे रंग सुद्धा केवढे असायचे. ते सगळे एकमेकांच्या अंगावर टाकायचे. राजकपूरकडची धुळवड ऐकली आहे. पांढरे नवीन कपडे घालून रंग खेळायचा. कालही छान होते आजही छान आहे.एक आणखी कालच्यातली गंमत. घरोघरी एकदोघे जायचे. त्याला जबरदस्तीने बाहेर काढायचे. त्याला रंग लावायचा. मग दुसरीकडे जायचे.असे एकेक करत जमा व्हायचे.आता सगळे स्वखुशीने ठरवून रंग खेळतात. तेव्हा ती मजा वेगळीच होती.

**प्रा. अंजली पळणीटकर**/नागपूर

### १५ एप्रिल मराठी गझल दिवस म्हणून जाहीर करावा

२७ फेब्रुवारी हा आपल्या महाराष्ट्रात मराठी भाषा दिवस म्हणून आपण साजरा करतो.कारण हा कवी कुसुमाग्रज यांचा जन्म दिवस आहे.तसेच केंद्र सरकारने सुद्धा आता मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल केला आहे. त्याबद्दल केंद्र सरकारचे अभिनंदन. मात्र कविवर्य सुरेश भट यांनी आज मराठी गझल हा काव्यप्रकार महाराष्ट्रात त्याचप्रमाणे तो सातासमुद्रापार नेला आहे.आज अनेक लोक सशक्तपणे मराठी गझल हा काव्यप्रकारलिहीत आहे. भीमराव पांचाळे, डॉ. राजेश उमाळे आणि सुधाकर कदम यांनी आपल्या संगीताच्या माध्यमातून हा प्रकार आज सातासमुद्रापार नेला आहे.मग त्यात संगीता जोशी, आशा पांडे, प्रदीप निफाडकर, म. भा. चव्हाण, सदानंद डबीर, श्रीराम पच्छिंद्रे, हेमंत डांगे, बबनराव सराडकर, प्रा. अरुण सांगोळे, प्रा. गंगाधर पुसतकर यांचा व इतरांचाही समावेश होतो. त्यामुळे मराठी गझल हा काव्यप्रकार लिहिणारे सुरेश भट यांचा १५ एप्रिल हा जन्म दिवस महाराष्ट्रात मराठी गझल दिवस म्हणून महाराष्ट्र शासनाने जाहीर करावा ही मुख्यमंत्री महोदयांना विनंती.

**विष्णू सोळंके**/७०२०३००८२४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कामाला लागा-अशोक पटवर्धन

**बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

महाराष्ट्र राज्यामध्ये महायुतीची सत्ता प्रस्थापित झाली असून शिवसेना महायुतीचा एक भाग आहे. यामुळे आपण सर्वजण सत्तेत आहोत. या सत्तेचा लाभ जनते पर्यंत पोहचवा. काही महिन्यातच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे आतापासूनच तयारीला लागा असे नवनिर्वाचित शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांनी आढावा बैठकीत मार्गदर्शन केले. याबरोबरच पुढील महिन्यात पुन्हा एकदा तालुका निहाय बैठकीचे आयोजन करण्यात येणार असून त्यामध्ये सर्वांनी आपआपल्या कामाचा अहवाल घेऊन उपस्थित राहायचे आहे असे देखील अशोक पटवर्धन यांनी सर्व पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांना सांगितले.

दि. १८ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोड बीड येथे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक,



स्वप्नील भैय्या गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत अशोक पटवर्धन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने चर्चा केली. याबरोबरच बीड जिल्हा शिवसेनेची पुढील वाटचाल दिशा ध्येय धोरण सविस्तरपणे समजून सांगितले. यानंतर शिवसेना ओबीसी व्ही जे एनटी महाराष्ट्र संपर्कप्रमुख किरण चव्हाण, युवसेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे आणि ऋषि जगताप यांचे वाढदिवसानिमित्त शुभेच्छा सत्कार करून बीड जिल्हा शिवसेनेच्या अभिष्टचिंतन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी माजी सरपंच पदाधिकारी लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा-जगताप, मुळूक गलधर

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्यांच्या मनातील आवडत नेतृत्व आहेत. कार्यकर्त्यांना जपणे त्यांना आधार देणे ही शिंदे साहेबांची सवय बनलेली आहे म्हणूनच शिंदे साहेबांच्या नेतृत्वात अवघ्या महाराष्ट्रभरात शिवसेनेची ताकद वाढत चालली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. आपल्या आगामी निवडणुकात संपूर्ण बीड जिल्ह्यात शिवसेनेचा भगवा फडकवायचा असून आपले नेते एकनाथजी शिंदे साहेब यांचे हात देखील आपल्याला बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागायाचे आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी आढावा बैठकीत अवाहन केले.



गेवराई : रब्बी हंगामातील पिकांची काढणी अंतिम टप्प्यात असून सिरसदेवी येथे मळणीयंत्राद्वारे गव्हाचे खळे सुरू आहे. मेहनतीने पिकविलेल्या धान्याची रास गोळा करताना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होते. (छाया: कृष्णा शिंदे)

# विकास बनसोडे याच्या मारेकऱ्यास तात्काळ अटक करून फाशी द्या-मोरे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

ट्रक चालवुन आपली व कुटूंबीयांची उपजिवीका भागविणाऱ्या विकास बनसोडे या २५ वर्षीय तरूणास मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून कठोर शासन करून फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केली आहे.



मुळचा जालना येथील विकास बनसोडे हा पिंपरी घुमरी ता. आष्टी येथील भाउसाहेब क्षीरसागर यांच्या ट्रकवर चालक म्हणुन काम करत होता. भाउसाहेब क्षीरसागर यांच्या मुलीशी त्याचे प्रेमसंबंध असल्याच्या संशयावरून क्षीरसागर कुटुंबीयाने बनसोडे यास पकडून घराजवळील पत्र्याच्या शेडमध्ये बांधुन टाकत दोन आणि वायाराच्या सहाय्याने विकासला बेदम मारहाण केली. यातच त्याचा मृत्यु झाला आहे.त्याच्या शरीरावर मोजता येणार नाहीत एवढे वळ आहेत. त्यामुळे विकास बनसोडे यास मारणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करून शासनाने कठोर कारवाई करून त्यांना फाशिची शिक्षा द्यावी अशी मागणी उपसभापती श्रीहरी नाना मोरे यांनी केली आहे.

# सौ.संजीवनी जाधव व डॉ.प्रियांका डाके ठरल्या मिसेस माजलगावच्या मानकरी

## रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुल च्यावतीने मिसेस माजलगाव कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मार्च**

दिनांक १६ मार्च रोजी रोटरी क्लब, मंगलनाथ मल्टिस्टेट व इगलवूड स्कुलच्या वतीने मिसेस माजलगाव या अनोख्या उपक्रमाच्या माध्यमातून स्पर्धचे आयोजन इगलवूड स्कूल फुले पिंपळगाव येथे करण्यात आले होते.कार्यक्रमात प्रथम क्रमांक सौ.संजीवनी जाधव तर द्वितीय क्रमांक डॉ.सौ.प्रियांका डाके यांनी मिळवला. तृतीय क्रमांक सौ.शीतल मालानी यांनी मिळवला तर सौ शुभांगी आनंदगावकर यांनी चौथ्या स्थानावर येण्याचा मान मिळवला.या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते.माजलगाव शहर व परिसरातील महिलांनी सहभाग नोंदवून उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन बक्षिसे जिंकली.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे अध्यक्ष तथा मंगलनाथ मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक ॲड.रवींद्र कानडे, प्रकल्प प्रमुख डॉ.अर्चना पवार व रोटरियन अशोक बजाज, लक्ष्मीनारायण मुंदडा, शशी किरण गडम, सुरेश भानप, पंडित तिडके, डॉ.स्वानंद कुलकर्णी, जगदीश साखरे, गवारे सर, दिगंबर महाजन, डॉ.अंजली अकोलकर, डॉ.अर्चना मोरे, सौ.स्मिता लिमगावकर, शोभा वर्मा, सौ.सोळंके उपस्थित होते.

त्याचप्रमाणे इनरव्हील क्लब ऑफ माजलगावच्या अध्यक्ष सौ.प्राजक्ता गुंडेवार, सेक्रेटरी सौ.स्मिता कानडे व इनरव्हील क्लबच्या सर्व मेंबर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु.जान्हवी वाघ आणि कु.प्रांजल देशमुख या विद्यार्थीनिंनी केले. मिसेस माजलगाव या सौंदर्य स्पर्धेचे सूत्रसंचालन सौ.प्रणिता मॅडम यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजित सरांनी केले. सदरील कार्यक्रमाकरिता माजलगाव शहर व परिसरातील शेकडोच्या संख्येने महिला उपस्थित होत्या. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रोटरी क्लब ऑफ माजलगाव सिटीचे सर्व सदस्य, ईगलवूड इंग्लिश स्कूल व श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा सर्व स्टाफ यांनी परिश्रम घेतले.

# गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतनानिमीत्त रक्तदान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१८ मार्च**

प.पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर च्या वतीने श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊलींच्या अभिष्टचिंतन निमित्त दि. १९ मार्च बुधवार रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर प. पू. गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज अन्ड कॅन्सर रिसर्च सेंटर येथे सकाळी १० वाजल्यापासून सुरू होणार आहे. या रक्तदान शिबीरात सहभागी होऊन रक्तदान करण्याचे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले आहे.

दि. १९ मार्च ते ३० मार्च दरम्यान सध्या मुळव्याध, भगंदर, नासर, बालरोग, सर्व महिला रोग, मासिक पाळी चे आजार, वंध्यत्व, पोटाचे विकार, वृध्दपकाळातील आजार, मधुमेह, पंचकर्म यासह विविध प्रकारच्या आजारांचे मोफत तपासणी शिबिर चालू आहे या शिबीराचा माजलगाव शहरासह तालुक्यातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ यशवंत राजेभोसले, रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल चे अध्यक्ष पांडुरंग चांडक, सचिव प्रभाकर शेटे तसेच श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे तालुका प्रतिनिधी शिवशंकर भंडारे, केंद्र प्रतिनिधी दिगंबर सोळंके, अमोल सोळंके, रामराजे रांजवण, लक्ष्मण चुंबळे, सदाशिव ढगे, काशिनाथ काटकर, गजु चौधरी, डॉ अशोक घुबडे, डॉ शशिल पाचपोर, लक्ष्मण सोळंके, विशाल देवकते, शरद रुचके, रामप्रसाद गोळेकर, गजानन गोळेकर, गोरख मेंडके आदींनी केले आहे..

# बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

## आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**



आमदार विजयसिंह पंडित यांनी विधानसभेमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीड येथे नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती, त्यांच्या मागणीला यश आले असून उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा उल्लेख करून विधानसभेत बीड येथे नवीन विमानतळ उभारण्याची घोषणा केली. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळणार असून जिल्ह्यातील उद्योग वाढीला मोठा फायदा होणार आहे.

गेवराई विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सक्रिय सहभाग नोंदवत विविध विषयांची प्रभावी मांडणी केली आहे. अर्थमंत्री ना अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चे दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना देण्यासाठी नवीन विमानतळ उभारणीची मागणी केली होती. अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांनी आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीचा गांभीर्याने विचार करून बीड येथे नवीन विमानतळ उभारणीसाठी कार्यवाही सुरू करत असल्याची घोषणा केली. यामुळे बीड येथे नवीन विमानतळ उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळणार आहे. बीड जिल्हाधिकारी यांनी याबाबतच प्रस्ताव पाठवला असून त्यावर भूसंपादन आणि इतर सोपस्कार व्हावे तसेच इतर बाबीवर कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे सांगून बीड येथे कमीत कमी तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारली जाईल असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या ग्रामीण भागाला विकासाच्या टप्प्यात येता येणार आहे. पर्यटन आणि इतर व्यवसायाला चालना मिळेल असेही ते यावेळी म्हणाले.

दरम्यान विजयसिंह पंडित यांनी विधानसभा सदस्य झाल्यानंतर आपल्या भागातील विकासाचे अनेक प्रश्न त्यांनी विधानसभेत मांडले. जलसंधारण, कृषी याबरोबरच विमानतळ उभा करण्याची मागणी करून त्यांनी आपल्या भविष्यवेधी नेतृत्वाची झलक दाखवली. आ. विजयसिंह पंडित यांनी बीडच्या विमानतळाचा प्रश्न निकाली काढल्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व स्तरातून त्यांचे आभार मानण्यात येत आहेत.

# मनोजदादा जरांगे यांची शिवाजीराव पंडित यांनी घेतली भेट

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१८ मार्च**

मराठा आरक्षणासाठी लढणारे संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली. मराठा आरक्षणाशिवाय मराठा समाजाचा उद्धार होऊ शकत नाही, मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे यांनी जो लढा उभारला तो योग्यच आहे. आपण आणि शिवछत्र परिवर मराठा आरक्षणासाठी आग्रही राहीलो. यापुढील काळात आपण मनोज जरांगे यांच्या सोबतच राहू असे प्रतिपादन माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांनी केले.

माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित यांनी आज संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांची भेट घेऊन त्यांच्या तब्येतीची चौकशी केली. आपण तब्येत सांभाळावी, मराठा समाजाला आपली गरज आहे. तुमच्या छायेखाली मराठा समाज एक झाला असून ही वज्रमूठ आता कोणीही रोखू शकत नाही. मराठा आरक्षणासाठी आपण कायम रस्त्यावर उतरलो. या वयातही आपण मराठा आरक्षण मिळवण्यासाठी संघर्ष केला. यापुढील काळात मराठा आरक्षणासाठी आपण कायम मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत आहोत असेही ते यावेळी म्हणाले. याप्रसंगी त्यांच्या सोबत जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अठरापगड जातींना सोबत घेऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लढणार-राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सामाजिक न्याय विभागाची बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे पार पडली, यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रांत अध्यक्ष पंडित कांबळे सर यांच्या उपस्थितीत बैठक बोलण्यात आली होती. यावेळी मराठवाड्याच्या सर्व जिल्ह्यातून प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के असे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हा आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारधारेवर चालतो त्यांनी अठरापगड जातींना सोबत घेऊन त्यांच्या न्याय हक्कासाठी सातत्याने प्रयत्न केला आहे, मराठवाड्याच्या विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी पुढाकार घेणारा नेता म्हणून पवार साहेबांची ओळख आहे,नामांतरांच्या वेळेला राजकीय किंमत मोजावी लागली तरी चालेल परंतु मराठवाडा विद्यापीठाला डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचे काम पवार साहेबांनी केले आहे, पवार साहेब नेहमीच पुरोगामी विचार जोपासणारा नेता आहे अशा नेत्याच्या नेतृत्वाखाली आपण सर्व सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करतो, येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये देखील वंचित समाजाला प्रतिनिधित्व देण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष करणार असल्यास मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केले.

यावेळी प्रांताध्यक्ष श्री पंडित कांबळे सर यांनी असे सांगितले की माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील व्यक्तीला पवार साहेबांनी सामाजिक न्याय विभागाची जबाबदारी दिली आहे, ती योग्यरित्या मी पार पाडत आहे श्री कांबळे यांनी बाळासाहेब शिनगारे यांना जिल्हा कार्याध्यक्षाची जबाबदारी दिली होती, त्यांचे काम पाहून बाळासाहेब शिनगारे यांची सामाजिक न्याय विभागाच्या बीड जिल्हाअध्यक्ष पदाचे नव्याने घोषणा केली आहे. बाळासाहेब शिनगारे हे बीड जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष वाढवण्यासाठी दिनदलित वंचित घटकांना एकत्र करून पवार साहेबांचे हात बळकट करणार आहेत, अशा भावना श्री कांबळे यांनी व्यक्त केल्या.

यावेळी केज मतदार संघाचे माजी आमदार पृथ्वीराज साठे , सामाजिक न्याय विभागाचे पतीश उपाध्यक्ष संजय गायकवाड,भिमराव जी,रविभाऊ खिल्लारे, तूप सौंदर साहेब,प्रदेश सचिव के के वडमारे , राहुल बनसोडे, भास्कर कुन्हे, लक्ष्मण कांबळे, तुकाराम साळुंखे, अंकुशराव दोडके,तानाजी लांडगे, सुधाकर जोगदंड, महादेव हजारे, श्रीमती मगरे ताई ,श्रीमती भोसले ताई, श्रीमती ज्योतीताई,अमोल पारवे, खुर्शीद आलम, आबा करडुले, शफिक काजी, सुधाकर चव्हाण, महेश सावंत, पंकज धांडे, अनिल शेळके, सचिन आगाम, महेश भिसे, बद्रीनाथ जटाळ, राकेश बिराजदार,सह आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# बीड जिल्हा कारागृह येथे प्रिझन टू प्राईड कार्यक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१८ मार्च**

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड संभाजीनगर यांच्यामार्फत बीड जिल्हा कारागृह येथे प्रिझन टू प्राईड कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कारागृहातील बंद्यासाठी कॅरम व बुद्धिबळ खेळाचे साहित्य पुरविण्यात आले. तसेच सदर खेळाचे प्रशिक्षित प्रशिक्षकामार्फत बंदयाना एक महिन्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर खेळाचे प्रशिक्षणासाठी ४० बंद्यानी सहभाग घेतला आहे.सदर कार्यक्रम विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह) मध्य विभाग छत्रपती संभाजी नगर यांच्या परवानगीने व इंडियन ऑइल कंपनीचे चीप मॅनेजर एलपीजी इक्बाल सिद्दिकी संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाने घेण्यात येत आहे.सदर कार्यक्रमास इंडियन ऑइल कार्पोरेशन लिमिटेड संभाजीनगर येथील श्री अमित



विकास बोरसे, जयसिंग, इफ्तेकार, वाघमारे उपस्थित होते तसेच बीड जिल्हा कारागृह येथील प्र.अधीक्षक बक्सार मुलानी, संजय राऊत, ज्ञानेश्वर डोईफोडे, सुधाकर मुंडे, कृष्णा ढाकणे, राहुल राठोड कर्मचारी उपस्थितीत होते तसेच कारागृहातील बंदी बांधव उपस्थित होते.

लातूर
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## समता सैनिक दलाचा जवान तयार होणे काळाची गरज : अरुण लोखंडे

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१७ मार्च -**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या भारतीय बौद्ध महासभा, आरपीआय व समता सैनिक दल या तीन शाखाचे जतन आणि संर्वधन करणे ही आजच्या तरुण पिढीची जबाबदारी आहे. प्रत्येक कुटुंबातून समता सैनिक दलाचा जवान तयार होणे ही काळाची गरज आहे, असे विचार अरुण लोखंडे यांनी जळकोट येथे व्यक्त केले.

येथील भीमनगरमध्ये समता सैनिक दलाचा ९८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना लोखंडे हे बोलत होते. याप्रसंगी सुनिल माने, प्रदिप लोखंडे, सत्री गायकवाड, कुशिंदर लोखंडे, बिबीसेन लोखंडे, युवराज लोखंडे, सुमंत लोखंडे, पाडूरंग लोखंडे, अविनाश लोखंडे, ज्योती लोखंडे, सुप्रीया लोखंडे, नगिना लोखंडे, सपना गायकवाड, कोमल माने, प्रज्ञा माने, जयश्री लोखंडे, सुशिलाबाई लोखंडे, वैजंता माने, सारीका भालेराव, हिराबाई लोखंडे, बबीता लोखंडे, राधिका लोखंडे, सुमन लोखंडे, गोकर्ण लोखंडे, मनिषा गायकवाड, मंगल गायकवाड, स्नेहा माने, वैष्णवी गायडवाड, असावरी लोखंडे, देवयानी लोखंडे, पृथ्वी बनसोडे, सानिका माने, अदिती माने, अस्मीता लोखंडे, सोनाली लोखंडे, भीमनगरमधील शालेय मुले, मुली बौद्ध उपासक, उपासीका उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### निलंग्यात वाईट सवयींची होळी

**निलंगा, दि.१७ मार्च -**

शहरातील दापका वेस कुंभार गल्ली येथे तरुणांनी आपल्या जिवन जगण्यातील वाईट गुण जाळून होळी साजरी केली.त्यामध्ये मोबाईलचा अती वापर, दुर्गुण, आळस, वाईट सवयी यांचे दहन केले. आजची तरूण पिढी या वाईट सवयीमध्ये गुरफटून गेली आहे. त्यातून त्यांना बाहेर काढणे महत्वाचे आहे. या वाईट सवयी यांचे फलक हातात घेऊन त्यांचे दहन केले. आणि पर्यावरणाचे रक्षण करणार, जीवनामध्ये या वाईट सवयीचा त्याग करणार असा संकल्प शपथ घेऊन केला. हि शपथ समाजसेवक गुरुनाथ मोहोळकर यांनी तरुणांना दिली. यावेळी सुधाकर मोहोळकर, प्रवीण मोहोळकर, अथर्व प्रवीण मोहोळकर, समर्थ कुंभार, प्रथमेश कुंभार, समर्थ आश्लेषा, गोपाळ टोंपे, समर्थ मोहोळकर, प्रल्हाद मोहोळकर, कुंभार नटु, वरद वाघमारे, श्रावणी मोहोळकर, जागृती मोहोळकर, श्रद्धा मोहोळकर, कांचन मोहोळकर, रुपाली मोहोळकर इत्यादी उपस्थित होते.

### शिगवण व सुपेकर यांना खो-खो स्पर्धेत सुवर्ण पदक

**उदगीर, दि.१७ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे खेळाडू शुभम शिगवण आणि संकेत सुपेकर यांनी आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावून महाविद्यालयासह सन्मान उंचावला आहे.



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या खो-खो संघात त्यांची निवड झाली होती. त्यांनी विक्रांत विद्यापीठ, ग्वालियर (मध्यप्रदेश) येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत प्रतिनिधित्व करत अप्रतिम खेळ प्रदर्शन केले आणि सुवर्णपदक मिळवले. त्यांच्या या यशामुळे आता नांदेड विद्यापीठाचा संघ मेंगलोर युनिव्हर्सिटी, कर्नाटक येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत खेळणार आहे. या उल्लेखनीय यशामागे क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे आणि प्रा. रोहन एनाडले यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी, उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी, सचिव रामचंद्र तिरुके, सहसचिव ॲड.एस.टी. पाटील चिघळीकर आणि डॉ. रामप्रसाद लखोटिया, कोषाध्यक्ष भालचंद्र चाकूरकर तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

### अध्यक्षपदी आ. संजय बनसोडे यांची बिनविरोध निवड

**उदगीर, दि.१७ मार्च -**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी व



नवीन कार्यकारणीची निवड करणे व मागील वर्षाच्या खर्चाचा आराखडा देण्यासाठी शहरातील नालंदा बुद्ध विहारात माजीनगर सेवक श्रीरंग कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत सर्वानुमते राज्याचे माजी क्रीडा मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे यांची अध्यक्षपदी एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. या कार्याध्यक्षपदी देविदास कांबळे यांचीही निवड करण्यात आली. यावेळी भीमसैनिक, समाज बांधव, विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील खेळाडुंनी देशपातळीवर नावलौकिक वाढवावा : आ. संजय बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१७ मार्च -**

गेल्या दिड वर्षाच्या कार्यकाळात क्रीडा विभागाचा मंत्री म्हणून काम करत असताना राज्यातील खेळाडुंच्या हितासाठी अनेक हिताचे निर्णय घेवुन खेळाडुंना प्रोत्साहित केले. आपल्या ग्रामीण भागातील खेळाडुंना देशपातळीवर खेळण्याची संधी प्राप्त व्हावी म्हणून उदगीरला स्व. खाशाबा जाधव राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा, फुटबॉलचे डे-नाईट सामने मिनीस्टर ट्रॉफी सह विविध स्पर्धा घेवुन खेळाडुंना प्रोत्साहान दिले. त्यामुळे ग्रामीण भागातील खेळाडुंनी जिद्द व चिकाटीने खेळुन देशपातळीवर आपला नावलौकिक वाढवावा, असे मत माजी क्रिडा मंत्री आ. संजय बनसोडे यांनी सांगितले.

ते उदगीर तालुक्यातील दावणगाव येथे आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंती निमित्त भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा आ. संजय बनसोडे आमदार चषक २०२५ च्या समारोप समारंभाप्रसंगी बोलत होते. यावेळी प्रा. श्याम डावळे, धानाजी मुळे, राजकुमार बिरादार, यशवंत ढगे, योगेश फुले, यादवराव केंद्रे, रमेश भंडे, लक्ष्मण कुंडगिर, विश्वनाथ भंडे, युसुफ घाडीवाले आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ. बनसोडे म्हणाले की, मी सदैव खेळाडुंच्या हितासाठी प्रयत्नशील असुन मागील काळात विविध राज्यस्तरीय स्पर्धा घेतल्या आहेत. या स्पर्धेसाठी जिल्हायातील सर्व संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. या आमदार चषक स्पर्धेचा अंतिम सामना हा दावणगाव व शेकापुर यांच्यात होत असुन दोन्ही संघाच्या



खेळाडुंनी जीव ओतून खेळुन आपल्या भागाचे नाव करावे.

सदर सामने हे १० (षटकाचे) असल्याने चुरस अधिक असेल आपल्या भागात टी-टेन सामने खेळवण्याची कदाचित ही पहिलीच वेळ असुन ग्रामीण भागातील खेळाडुंना भविष्यात अडचण होवु नये म्हणून उदगीरमध्ये क्रीडा संकुल उभारत असुन त्याचेही काम लवकरच सुरु होणार असल्याचे आ. संजय बनसोडे यांनी सांगितले.

# नागरिकांनी उष्माघातेच्या बचावासाठी आरोग्याची काळजी घेणे गरजेचे

## डॉ. आरती घोरुडे यांचा सल्ला

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१७ मार्च -**



चालू मार्च, एप्रिल महिन्यात उष्णतेची लाट, येत असल्याची हवामान खात्याने वर्तवल्याप्रमाणे देशासह महाराष्ट्र राज्यात उष्णतेची लाट येत असल्याने उष्णतेचा पारा ४० ते ५० अंशापर्यंत वाढण्याची शक्यता वर्तवल्याने या प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या गावासह नागरिकांनी उष्मघातेपासून आपले संरक्षण करण्यासाठी आरोग्याची काळजी घेण्याचे आव्हान वलांडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ. आरती घोरुडे यांनी केले आहे.



काही दिवसात तापमान ४० ते ५० अंश सेल्सिअस उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान तज्ञांनी वर्तवली आहे. त्यामुळे या उन्हाळ्याच्या दिवसात थंड पाणी किंवा आपल्या बर्फाचे पाणी पिण्याचे टाळावे, व साधे पाणी प्यावे, असा सल्ला आरोग्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला आहे.

आवश्यक कामे करण्यासाठी सकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत व संध्याकाळी चार ते सात वाजेपर्यंत करावे तर अतिआवश्यक कामासाठी बाहेर जाण्याचे असेल तर नागरिकांनी आपल्या अंगावरती कपडे हे सुती वापरावे व डोक्याला सुती रुमाल बांधावे तर डोळ्यांच्या सुरक्षेसाठी थंड चष्मे घालावे व तोंडावरती मॅंसचा वापर करूनच बाहेर पडावे एवढे करूनही काहींना उष्मघाताचा अंदाज येत असल्यास त्वरित प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल व्हावे, यासाठी या प्राथमिक आरोग्य केंद्रात उष्मघातांच्या रुग्णांसाठी सर्व औषध उपचारासाठी किट ठेवण्यात आली आहे, असे आव्हान वैद्यकीय अधिकारी डॉ. आरती घोरूडे यांनी केले आहे.

▶▶ उष्मघातापासून बचाव होण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे. तहानलगली नसतानाही पाणी प्यावे. घरी तयार केलेले ताक,लिंबूपाणी, नारळ पाणी, फळांचे रस असे द्रव पदार्थ घावे. डोक्यावर टोपी रुमालसह छत्री वापरावी, घरात थेट सूर्यप्रकाशाला अडवावे, प्रवासा वेळी पाण्याची बाटली जवळ ठेवावी, पाण्याचे प्रमाण अधिक असलेले फळे, भाज्या खावे. फळे उन्हाळ्यात सतत खावे, असा सल्ला नागरिकांना डॉ. विद्यासागर बिरादार यांनी दिले.

# छत्रपती शिवाजी राजे महाविद्यालयामध्ये वनस्पती शास्त्राच्या वतीने व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१७ मार्च -**

येथील छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्रातील करिअरच्या संधी या विषयावर राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विशेष व्याख्यान ठेवण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे तर प्रमुख पाहुणे डॉ. संजय बिरादारतर व्यासपीठावर वनस्पतीशास्त्र विभाप्रमुख डॉ.आर. पी. बिरादार, सहयोगी प्रा.डॉ. एस.व्ही. चाटें यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते डॉ. संजय बिरादार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हटले, विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सातत्य, धैर्य व जिज्ञासू वृत्ती व विषयातील सखोल ज्ञान मिळवणे महत्त्वाचे आहे. शासकीय, निमशासकीय, खाजगी क्षेत्रात रोजगाराच्या विविध संधी आहेत त्या संधीचा फायदा करून घ्या असेही म्हटले.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन डॉ. एस.व्ही. चाटे यांनी केले. तर आभार डॉ.एम.ए. पाटेकर यांनी मानले.

कार्यक्रमाचे नियोजन वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ.आर.पी. बिरादार, डॉ. डी.पी. पाटील, श्वेता कांबळे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

# शेतकऱ्याचा मिरची शेतीतील प्रयोग यशस्वीतेच्या दिशेने

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१७ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील दैठणा येथील शेतकऱ्याने पारंपरिक शेतीला फाटा देऊन साध्य केली मंडई बाग शेतीची किमया स्वतःच्या शेतीत पाणी उपलब्ध झाल्यानंतर बहुतेक शेतकरी ऊस हाच एक बागायती पीक म्हणून पहिली पसंती देतात. पण शिरूर अनंतपाळ तालुक्यातील दैठणा या गावचे प्रयोगशील शेतकरी अवधूत लक्ष्मण सांगवे यांच्याकडून एक एकर म्हणजे ४० गुंठे क्षेत्रावरती २१-२१ जातीच्या मिरचीची लागवड केलेली आहे आणि ही मिरची लागवड करून जवळपास अवघे ५० दिवस झालेले आहेत. तर येत्या आठ ते दहा दिवसात या मिरचीचा पहिला तोडा होणार आहे. प्रचंड फुलांनी आणि फळाने हे मिरचीचे शेत भरभरून आलेले दिसत आहे. गेल्या ५० दिवसात या मिरचीसाठी जवळपास १० ते १२ फवारण्या झालेल्या आहेत. या मिरचीसाठी पॉलिथिनचा वापर करून पाणी व्यवस्थापन सूक्ष्म सिंचन पद्धतीने म्हणजे ड्रीपच्या सहाय्याने केले जात आहे.



या मिरची पिकासाठी मार्गदर्शक म्हणून अवधूत सांगवे यांचे मित्र राहुल सांडगे यांच्याकडून होत आहे. यांच्या वेळोवेळी झालेल्या कृषी सल्लयातून हे मिरचीचे पिक दैठणा गावच्या शिवारात भरभरून आलेले आहे. अशा पद्धतीचा लागवड केलेला दैठणा शेत शिवारात हा एकमेव प्लॉट असल्यामुळे दैठणा गावच्या परिसरातील शेतकरी या प्लॉटला भेट देऊन या पिकाचे कौतुक करत आहेत.

# रुद्र महिला मंडळाच्या वतीने महिला दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१७ मार्च -**

रुद्र महिला मंडळ व दाक्षायणी महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुद्र महिला मंडळाच्या अध्यक्षा विजयाताई चवंडा व प्रमुख अतिथी म्हणून लतिका ढेले, शांताबाई गिराम, संगीता मिरकले, योग गुरु कलावती भातंब्रे, प्रेमा वतनी सह मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचा पुष्प व शाल देऊन सन्मान करण्यात आला.

त्यानंतर दाक्षायणी महिला मंडळाच्या अध्यक्षा कांचन काडवदे यांच्या वतीने मंडळातील सर्व महिलांचा सन्मान करण्यात आला. तसेच महिलांसाठी मनोरंजनात्मक



विविध खेळांचे आयोजन करण्यात आले होते व त्यांना प्रेरणा म्हणून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या महिलांना बक्षीस ही देण्यात आले. योगशिक्षिका कलावती भातांब्रे व लतिका ढेले यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोप विजया चवंडा यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दाक्षायणी महिला मंडळाच्या अध्यक्षा कांचन काडवादे यांनी केले तर सूत्रसंचालन सविता शेटकार यांनी केले. आभार सपना भालके यांनी मानले.

यावेळी प्रतिभा नीला, सपना भालके,चंद्रकला लांडगे, सीता शेटकार, हारूबाई निटूरे, मीरा दांडगे, सुलोचना कल्याणी यांनी आपले सुप्त कलागुण सादर केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी रुद्र महिला मंडळ व दाक्षायणी महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# छत्रपती संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर नष्ट करा

## विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे मुख्यमंत्र्यांना निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१७ मार्च -**

शहरात बजरंग दलाच्या वतिने क्रूरकर्मा, धर्मद्वेशी औरंगजेबाची कबर हटवण्यासाठी उपजिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. ज्याने धर्मवीर शंभुराजेंची हत्या केली, गुरू तेघबहादर, गुरू गोविंदसिंहांच्या मुलांची हत्या केली. हिंदु मंदिराचा उद्ध्वस्त केले



अशा क्रूरकर्मा राजाची कबर राहने म्हणजे हिंदुस्थानातील हिंदुच्या कपाळी गुलामीचे डाग राहिल म्हणून शासनाने लवकरात लवकर कबर हटवावी अन्यथा बजरंग दलाच्या वतिने लाखो हिंदुना सोबत घेऊन छ. संभाजीनगरकडे रवाना होणार आणि कारसेवा करून कबर तोडण्यात येईल.

यावेळी संतोष कुलकर्णी, महादेव घोणे, श्रीपाद करंजीकर, सचिन जळकोटे, अनिकेत कोळी, रोहित बोईनवाड, विष्णु महिंद्रकर, करण बुर्ले, आनंद बुर्ले, प्रशांत घंटेवाड, शिवम हिबाने, सतिश पाटील, शुभम लोणीकर, मनोज पुदाले, चंद्रकांत टेंगेटोल, अनिल पंचाक्षरी, व विश्व हिंदु परिषद, बजरंग दल, विद्यार्थी परिषद, सर्व हिंदुत्वादी संघटनेच पदाधिकारी उपस्थित होते.

## जळकोट येथे ग्राम दरबार उपक्रमांतर्गत एक दिवस गावकऱ्यासोबत कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१७ मार्च -**

ग्रामीण भागात नाविन्यपूर्ण उपक्रम व सेवा अंमलबजावणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, संभाजीनगर यांच्या आदेशाने व महाराष्ट्र शासनाच्यावतीने जळकोट येथे ग्राम दरबार उपक्रम अंतर्गत एक दिवस गावकऱ्यासोबत या कार्यक्रमात विविध खात्याच्या कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून विविध योजनेची माहिती दिली.

यावेळी महेश कदम, यशवंत कदम, राजू पाटील, बसवराज कवठे, कृष्णात मोरे, शिवाजीराव कदम, शंकर वाडीकर, अनिल छत्रे, पिंटू चूंगे, नामदेव कागे, कल्याणी साखरे, सुदीप चौधरी आदि उपस्थित होते.

# किनी कदू येथे सुवर्ण महोत्सवी अखंड शिवनाम सप्ताह उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१७ मार्च -**

कुटुंबातील प्रत्येक सदस्य आपापल्या कामकाजामध्ये व्यस्त असून त्याचे कुटुंब आणि कुटुंबातील सदस्य यांचे नातेगोते यांच्यावर फारसे लक्ष नाही. त्यामुळे समाजामध्ये अस्थिरता निर्माण झालेली आहे. समाजातील ही अस्थिरता दूर करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने परमेश्वराचे नामस्मरण चिंतन मनन करून युवकांना संस्कारक्षम करावे असे अभूतपूर्व कार्य शिव सप्ताहाच्या माध्यमातून केले जाते असे आग्रही प्रतिपादन वसमत थोरला मठाचे मठाधिपती परमपूज्य दिगंबर शिवाचार्य महाराज यांनी केले.

ते अहमदपूर तालुक्यातील किनी कदू येथील आयोजित सुवर्ण महोत्सवी अखंड शिवनाम सप्ताह च्या समारोपप्रसंगी आशीर्वचन पर मार्गदर्शन प्रसंगी बोलताना व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील, माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी आमदार बब्रुवाहन खंदाडे, महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्तीराव कांबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष रोडगे, बाजार समितीचे संचालक किशन पाटील,



शिवानंद हैबतपुरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. या अखंड सप्ताहामध्ये शिवपाठ, राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या परम रहस्य पारायण, बसवकथा, गाथा भजन, शिवपाठ आणि रात्रीच्या सुमाराला महाराष्ट्रातील नामवंत शिवाचार्यांच्या कीर्तनाची सेवा होती.

ग्रामस्थांच्या वतीने त्रिकाल वंदनी जग ज्योती महात्मा बसवेश्वर, परमपूज्य मन्मथ स्वामी, राष्ट्रसंत परमपूज्य डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज आणि वीर मठ संस्थांचे मठाधिपती परमपूज्य राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांची गावातून शोभायात्रा काढून मूर्तीची प्राण प्रतिष्ठापणा वीरमठ संस्थांनचे मठाधिपती परमपूज्य राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तीन ते पाचच्या दरम्यान शिभप. ॲड. शिवानंद हैबतपुरे यांची सुश्राव्य बसवकथा घेण्यात आली.

या अखंड शिवनाम सप्ताहाच्या निमित्ताने रक्तदान शिबिर घेण्यात आले त्यात ५० बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले. गेल्या पन्नास वर्षापासून गावातील अन्नदाते या सप्त्यासाठी अन्नदान करतात. त्या अन्नदात्यांचा सन्मान परमपूज्य दिगंबर शिवाचार्य महाराज थोरला मठ यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व सन्मान चिन्ह देऊन करण्यात आला.

सुवर्ण महोत्सवी अखंड शिवनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी सप्ताह समितीचे अध्यक्ष शिभप. विठ्ठलराव गुडमे, उपाध्यक्ष वैजनाथ मुरडे, शिभप. शिवलिंग पाटील, रामेश्वर भुरे, दिलीप शेंबाळे, संजय भुरे, भगवंतराव पाटील, माधव शेंबाळे, राजू तरगुडे, प्रा. व्यंकटराव भुरे, पद्माकर पाटील, शिवदास पाटील, नरसिंग मटके, आर. आर. पाटील, राजू पाटील, ओम पाटील, राहुल शेंबाळे, राजेंद्र भुरे, परमेश्वर भुरे, अंकुश पाटील, व्यंकटी पाटील, विश्वंभर मटके, काशिनाथ हिपळगावे, भास्कर पाटील, परमेश्वर भुरे आणि सप्ताह समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या ९१ शिक्षकांनी जूनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी अर्ज केला. त्यापैकी ४० शिक्षकांचे प्रस्ताव व्हेरीफाय करण्यात आले आहेत. सदरील शिक्षकांची १ एप्रील पूर्वी जूनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसह इतर मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन योजना संघटनेच्यावतीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

यावेळी दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील सर्व शिक्षकांची डीसीपीएस ची रक्कम गेल्या तीन वर्षापासून त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही. २०२१ पासून या रकमेवर मिळणारे व्याज सुध्दा बंद झालेले आहे. त्यामुळे ती रक्कम तत्काळ एनपीएस खात्यामध्ये जमा करावी, आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांची रक्कम त्यांच्या एनपीएस खात्यात जवळपास तीन वर्षापासून प्रलंबीत आहे. सदरील रक्कम जिल्हा परिषदेत आली असून एनपीएस खात्यात जमा करण्यात आली नाही. शिक्षकांची वैद्यकीय परीपूर्ततेची रक्कम मंजूर झालेली आहे ती रक्कम त्यांच्या खात्यात जमा करणे तसेच इतर काही देयकेही मंजूर झालेली आहेत. परंतु शिक्षकांना अद्यात ती मिळालेली नाहीत. सद-रील देयके देण्याचे आदेशीत करावे. चटोपाध्याय लागू झालेल्या शिक्षकांची फरकाची रक्कम मंजूर झालेली आहे. सदरील रक्कम शिक्षकांच्या खात्यात जमा करावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी कार्याध्यक्ष पी एन घुगे, दत्ता पडोळे, डी जी शिंदे, एम बी गाडे, पी पी राठोड, एस जी पोले, एस एन चव्हाण, डी व्ही दिपके, एम के इंगोले, बी व्ही गुंजकर, एन बी काळे, डी ए जाधव, डी एम धुळे, डि आर पुरी, पी व्ही दिपके, एस डी लोंढे, डी एस इडोळे, व्ही व्ही येरावार, के एस नरमीटवार, ए एस पडोळे, जे एम व्यवहारे आदींच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# न्यास नोंदणी कार्यालयातील शिपायासह एकास लाच घेतांना पकडले

## निकालाची प्रत देण्यासाठी मागितली लाच

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

येथील सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयातील शिपायासह अन्य एकास निकालाची प्रत देण्यासाठी ९ हजारांची लाच घेतांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सोमवारी दि १७ मार्च रोजी रंगेहाथ पकडले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांनी दिलेल्या माहीतीनुसार सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथील महात्मा ज्योतिबा फुले बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेची नोंदणी ८ मार्च २०२२ रोजी रद्द करण्यात आली होती. या प्रकरणात सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय हिंगोली यांच्याकडे सुनावणी झाली होती. या सुनावणीमध्ये कार्यालयाने संस्थेच्या बाजूने निकाल दिला होता. मात्र या निकालाची प्रत संस्था अध्यक्षाला मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी कार्यालयाकडे निकालाची प्रत मिळण्याबाबत अर्ज केला होता. त्यानंतर १२ मार्च रोजी तक्रारदाराच्या ओळखीचे असलेले खासगी इसम सुनील हटकर याने तक्रारदाराशी संपर्क साधून तुमचे काम करून देण्यासाठी कार्यालयाचे शिपाई कुलभूषण रोठे याने दहा हजार रूपयांची रक्कम लागते असा निर-ोप दिला. त्यावरून तक्रारदाराने शिपाई रोठे याची भेट घेतली असता त्याने ओळखीचे काम करून देण्यासाठी दहा हजार रूपयाची मागणी केली. याप्रकरणी तक्रारदाराने लाचलूचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार केली. या तक्रारीची पडताळणी करण्यात आली.

दरम्यान, दि १७ मार्च रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक प्रफुल्ल अंकुशकर, सहायक पोलिस उपनिरीक्षक युनूस शेख, विजय शुक्ला, जमादार ज्ञानेश्वर पंचलिंगे, भगवान मंडलीक, राजाराम फुपाटे, गजानन पवार, तानाजी मुंढे, रवींद्र वरणे, गोविंद शिंदे, वाघ, शेख अकबर, महिला पोलिस कर्मचारी योगिता अवचार यांच्या पथकाने सापळा रचला होता. सदर रक्कम शिपाई कुलभूषणयांने सु-नील याच्याकडे देण्यास सांगितले. तक्रारदाराकडून लाच घेताच पथकाने सुनील आणि कुलभूषण यांना रंगेहाथ पकडले. पथकाने आरोपीची अंगझडती घेतली असता कुलभूषण राठे यांचेकडे रोच २५ हजार १४० रूपये तसेच सॅमसंग कंपनीचे दोन अँड्राईड मोबाईल तसेच सुनील प्रल्हादराव हटकर रा कमलानगर यांचेकडे ९ हजार लाचेच्या रकमे व्यतिरिक्त २१०० रूपये रोख तसेच सॅमसंग कंपनीचा मोबाईल आढळला. दोघांचेही मोबाईल ताब्यात घेण्यात आले असून कुलभूषण रोठे याचे घर यवममाळ जिल्ह्यातील दिग्रस यैथे असल्याने ला-चलूचत विभाग यवतमाळ यांना ठराव देण्यात आला आहे. याप्रकरणी दोन्ही आरोपीविरूध्द शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिरड शहापूर येथे प्रयोगात्मक कलांचे शिबीर विधीनाट्य कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**शिरडशहापूर, १८ मार्च**

औंढा तालुक्यातील शिरडशहापूर येथे महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग ,सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित प्रयोगात्मक कलाचे शिबिर विधी नाट्य कार्यक्रमाचे ८ मार्च ते १७ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी केले. प्रमुख पाहुणे वसमत विधानसभा आमदार राजू नवघरे ,कळमनुरी विधानसभा आमदार संतोष बांगर, हिंगोली विधानसभा आमदार तानाजी मुटकुळे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मिलिंद यंबल यांना आमंत्रित करण्यात आले होते. हा दहा दिवस कार्यक्रम शिरडशहापूर येथील गोंधळ गल्ली, मंगल कार्यालय या ठिकाणी सुरू होता .या कार्यक्रमांमध्ये अकोला कळमनुरी परभणी बोरी दारेफळ सेनगाव ओझर पालम पारखेड परतुर शिरडशहापूर सह जवळपास १५ संघांनी सहभाग घेतला होता. यामध्ये वेगवेगळ्या



संघांनी आपली कला दाखवली.१७ मार्च रोजी प्रयोगात्मक कलांचे शिबिर विधी नाट्य कार्यक्रमांचा समारोह झाला. या कार्यक्रमास शिरडशहापूरचे सरपंच जितू रा-वळे यासह ग्रामपंचायतचे सदस्य उपस्थित होते. यावेळी आलेल्या संघांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन नारायण धोंगडे,देविदास धोंगडे, शामराव धोंगडे सह जय भवानी कला मंडळ शिरडशहापूर यांनी केले होते. तसेच प्रयोगात्मक कलाचे शिबिर प्रयोग सिद्ध लोककलाचे प्रशिक्षण देखील यामध्ये घेण्यात आले. त्यात पारंपारिक वाद्य आणि साज , छत्रपती शिवाजी महाराज पोवाडा माहिती, महापूजा देवी गीत, देव बोलावणे, लावणी, गोंधळ, जा-गरण पारंपारिक माहिती, पारंपारिक शाहू, फुले, आंबेडकर विषयी गीते सादत्रे, संबळ वाद्य, लोककला, व्यसनमुक्ती काळाची गरज ,गोंधळाची माहिती, जागरण पारंपारिक, भारुड शाहीरी, रंगीत तालीम गोंधळ, रंगीत तालीम व साजरीकरण या विषयावर या दहा दिवसांम ध्ये व्याख्याते शाहीर रमेश गिरी नांदेड,नारायण धोंगडे हिंगोली, शाहीर शामराव धोंगडे हिंगोली, कल्याण सुकळे बोरी, श्याम वामने बोरी, शाहीर प्रकाश दांडेकर खरवड, श्याम धोंगडे शिरडशहापूर, रमेश धोंगडे हट्टा, शाहीर मधुकर नावकार अकोला, आनंद धोंगडे शिरडशहापूर, श्यामसुंदर कुबडे, शाहीर रंगनाथ बिडवे परतुर, सखाराम नरवाडे वझुर, दत्तराव बामणे आरखेड, शाहीर नामदेव दीपक पिंपरी, रामदास नरवाडे दारेफळ आदी व्याख्याते यांनी सखोल असे मार्गदर्शन या शिबिरामध्ये उपस्थित संघातील सदस्यांना केले. या दहा दिवस शामराव धोंगडे व जय भवानी कला मंडळ शिरडशहापूर यांनी या कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले.


## संक्षिप्त वृत्त

### औंढ्यात विहिंप, बजरंग दलाकडून औरंगजेबाची कबर हटविण्याची मागणी



हिंगोली- छत्रपती संभाजी नगर येथे असलेली क्रूरकर्मा औरंगजेबाची कबर हटविण्यात यावी या मागणीचे निवेदन औंढा नागनाथ येथील विश्व हिंदू परिषद तसेच बजरंग दलाच्यावतीने तहसीलदारामार्फत शासनाला देण्यात आले आहे. औरंगजेबाने हिंदूची मंदिरे तोडली, हिंदुंचे धर्मांतरण केले तसेच अनेक हिंदूंची हत्या केली. अशा क्रुरकर्मा औरंगजेबाची कबर स्वतंत्र भारतात राहता कामा नये. सदरील कबर न हटविल्यास बजरंग दल आणि विश्व हिंदू परिषद कारसेवा करणार असल्याचा इशारा यावेळी कार्यकर्त्यांनी दिला. यावेळी सकल हिंदू समाज तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढली



हिंगोली- मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यात उन्हाची तीव्रता वाढली असून तापमान ३७ अंशांच्यावर जात आहे. त्यामुळे दुपारच्यावेळी रस्ते निर्मनुष्य दिसत असून शासकीय कार्यालये तसेच रस्त्यावर शुकशुकाट दिसत आहे. उन्हापासून बचावासाठी सुती मोठ्या रूमालाची, टोप्यांची खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करीत असतांना दिसत आहेत. दुपारच्या तीव्र झळापासून संरक्षण करण्यासाठी तोंडाला रूमाल बांधून प्रवास करीत असतांना वाहनचालक दिसत आहेत. दुसरीकडे ऊसाचा रस, टरबुज, खरबुज तसेच शीतपेयाच्या दुकानावर लोकांची गर्दी वाढू लागली आहे तसेच कुलर खरेदी करण्यासाठीही दुकानात ग्राहक येत आहेत.

### २५ वाहन चालकांवर कारवाई

हिंगोली- पोलिस विभागाच्यावतीने अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २५ वाहन चालकांवर कारवाई करीत दंड वसूल करण्यात आला आहे.

# श्रीराम कथा ज्ञानयज्ञ आयोजन समितीची आढावा बैठक, त्रिशुल नवदुर्गा समितीचा पुढाकार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

शहरातील त्रिशूल नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने यावर्षी पहिल्यांदाच ३० मार्च २०२५ ते ०७ एप्रिल २०२५ या कालावधीत श्रीराम कथा ज्ञानयज्ञचे आयोजन रामाकृष्णा स्कूल दत्त मंदिर मंगळवारा येथे करण्यात आले आहे. यासंदर्भात दि १७ मार्च रोजी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

महामंडलेश्वर प.पू. मां. कनकेश्वरी देवीजी यांच्या सुमधुर वाणीतून कथा होणार आहे. दररोज दुपारी तीन ते सहा वाजेपर्यंत श्रीराम कथा ज्ञानयज्ञ होणार आहे. तदनंतर रोज आयोजित महाप्रसादासाठी शहरातील विविध दानशूर व्यक्तींनी आपले योगदान जाहीर केलेले आहे. तसेच रोज होणाऱ्या कथे साठी विविध यजमान व्यक्तींनी सुद्धा आपली नावे नोंदविलेली आहे. त्या अनुषंगाने १७ मार्च रोजी संध्याकाळी आठ वाजता शहरातील अथर्व लॉन्स येथे श्रीराम कथा ज्ञानयज्ञ संदर्भात हिंगोली शहरातील सर्व प्रतिष्ठित व विविध धार्मिक मंडळातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात आली. आढावा बैठक मध्ये श्रीराम कथा ज्ञानयज्ञ धार्मिक कार्यक्रम हा सात दिवस घेण्यात येणार असून त्या अनुषंगाने विविध समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

३० मार्च रोजी सकाळी भव्य कलशशोभा यात्रा काढण्यात येणार असून या कलश यात्रेमध्ये मोठ्या संख्येने महिला उपस्थित राहणार आहेत. श्रीराम कथा ज्ञान यज्ञ चा लाभ भाविक भक्ताने जास्तीत जास्त संख्येने घ्यावा असे आव्हानही श्री त्रिशूल नवदुर्गा महोत्सव समिती हिंगोलीच्यावतीने करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कालावधी ११ महिने

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मि ळण्याची क्षमता वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणाचा कालावधी ११ महिने करण्यास दिनांक १० मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेअंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेत पुन्हा रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ महिन्याच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण अनुज्ञेय असेल. त्याअनुषंगाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत पुढील ५ म हिन्याकरिता नियुक्ती देतांना खा-लील बाबींची नोंद घ्यावी. या योजनेअंतर्गत सद्यस्थितीत जे उम ेदवार कार्यप्रशिक्षण घेत आहेत, त्यांचा कार्यप्रशिक्षण कालावधी ते रुजू झाल्याच्या दिनांकापासून ११ महिने असा असेल याची दक्षता आपल्या स्तरावरून घेण्यात यावी. तसेच ज्या प्रशिक्षणार्थीचा ६ महिन्याचा प्रशिक्षण कालावधी यापूर्वीच पूर्ण झाला आहे. अशा उमेदवारांना पुढील ५ महिन्याच्या प्रशिक्षणासाठी सबंधित आस्थाप-नेत रूजू होण्याकरिता उमेदवारांना दि. ३० एप्रिल २०२५ पूर्वी रूजू करून घेवून आस्थापनेच्या लेटर हेडवर नियुक्ती आदेश हार्ड कॉपीसह जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन कार्यालय हिंगोली येथे प्रत्यक्ष जमा करावे. असे अवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, म ॉडेल करिअर सेंटरचे आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे यांनी केले आहे.

# तोंडापूर येथील कृषी विज्ञान केंद्रात हळद पिकासाठीचे प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १८ मार्च**

मसाला मंडळ, प्रादेशिक कार्यालय मुंबई आणि कृषि विज्ञान केंद्र तोंडापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हळद पिकासाठी 'उत्तम कृषि पद्धती आणि स्वच्छ हळद प्रक्रिया' या विषयावर एक दिवसीय शेतकरी क्षमता वृध्दी प्रशिक्षण कार्यक्रम कृषि विज्ञान केंद्र तोंडापूर येथे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. पी. पी. शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.



यावेळी मुंबई मसाले बोर्डाचे विस्तार सहायक किशोर कुमार यांनी स्पाइसेस बोर्डाचे कार्य, उद्देश, ५२ विविध स्पाइसेस बोर्डमध्ये समाविष्ट आहेत, तसेच २६ राज्यामध्ये हे बोर्ड कार्य करत आहे व स्पाइ-सेस पार्क, हळदीचे बॉयलर, पॉलिशर व त्याकरिता असलेल्या अनुदानाविषयी माहिती दिली.

मा. बाळासाहेब ठाकरे हळद (हरीद्रा) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे तंत्र अधिकारी रमेश देशमुख यांनी भौगोलिक मानांकन असलेली वसमत हळद, त्यांची काही उदाहरणे, हळदीच्या विविध वाणाचे महत्त्व व त्याची लागवड करण्याची पध्दत, चांगल्या स्वच्छता पद्धतीने हळद प्रक्रिया ज्यामध्ये जागेची निवड, बियाणे आणि लागवड साहित्य, लागवडीसाठी पिक व्यवस्थापन व कीटकनाशक वापरताना घ्यावयाची काळजी या विषयावर सविस्तर माहिती दिली.

श्री दत्तगुरू शेतकरी उत्प-ादक कंपनी, कळमनुरीचे संचालक गंगाधर श्रृंगारे यांनी हळद उत्पादन कसे वाढवायचे, त्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करावा. दर दिवशी माणसाला १० ग्राम प्रती दिवस प्रति व्यक्ती हळद लागते. हे प्रमाण आपण २० ग्राम प्रती माणशीवर नेऊ शकल्यास जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब ठरेल. त्याकरिता आपण योग्य हळदीचे व्यवस्थापन करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

उद्यानविद्या विषय विशेषज्ञ अनिल ओळंबे यांनी म ार्गदर्शन करतांना हळदीचे प्रकार, महत्व, खाण्याची हळद, देशातील हळदीची लागवड आणि उत्प-ादन, हिंगोली जिल्ह्याचे वर्षनिहाय लागवड क्षेत्र, उत्पादकता वाढविण्याचे सूत्रे, हवामान सरासरी २५ ते ३५ अंश सेल्सिअस तापमानामध्ये पिकाची वाढ चांगली होते, चुनखडीयुक्त जमीन लागवडीकरिता टाळावी, माती परीक्षण, पूर्व मशागत, सुधारित वाणाची निवड, योग्य बेण्याची निवड, बेणे प्रक्रिया, जमीन चुनखडीयुक्त जमीन टाळावी, पूर्व मशागत, सुधारित वाणाची निवड, लागवडीची वेळ, तण नाशकाचा वापर, एकात्मिक खत, कीड व रोग व्यवस्थापन तसेच मागील चार वर्षापासून हळदीच्या भावामध्ये चढउतार होत आहे. त्याकरिता शेतकऱ्यांनी चांगली प्रतीच्या हळदीचे उत्पादन घेणे गरजेचे असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अतुल मुराई व आभार प्रदर्शन अनिल ओळंबे यांनी केले. तालुका कृषि अधिकारी महादेव कुंभार, संजय शिंदे, मसाले विस्तार प्रशिक्षणार्थी सूरज गमरे तसेच हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावातील हळद लागवड शेतकरी व युवक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तामसा येथे पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.१८ मार्च**

माणुसकीला काळीमा फासणारी घटना हदगाव तालुक्यातील तामसा शहरात घडली आहे. एका ५५ वर्षीय इसमाने शेजारच्या ७ व्या वर्गात शिकणाऱ्या १२ वर्षीय अल्पवयीन मुलीला वाईट नजरेने पाहून अश्लील इशारे केल्याच्या पिडीत मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन तामसा पोलिसांनी पोस्कॉअंतर्गत गुन्हा दाखल केल्याची घटना दि. १७ रोजी सोमवारी रात्री नऊ वाजताचे दरम्यान तामसा शहरात घडली. घडलेल्या घटनेमुळे तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे. तामसा पोलिसांनी विलंब न करता रात्री एक वाजताच्या दरम्यान आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.

मागील एक महिन्यापूर्वी तामसा येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या नराधम मुख्याध्यापकाने शाळेतीलच दहाव्या वर्गात शिकणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याच्या घटनेने सगळीकडेच मोठी खळबळ उडवून दिली होती. तो नराधम मुख्याध्यापक सध्या जेलची हवा खात आहे. ही घटना आजूनही ताजी असतानाच तामसा येथील एका ५५ वर्षीय इसम कांतराव नारायणराव शेकदार याने अल्पवयीन मुलीला अश्लील इशारे केल्यावरुन पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने तामस्यात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. आरोपी कांतराव शेकदार याने दि. २७ जानेवारी रोजी इयत्ता ७ वीत शिकणाऱ्या घराशेजारी, गल्लीत राहणाऱ्या व वडिलांचे छत्र हरवलेल्या एका अल्पवयीन मुलीलाचा पाठलाग करून, तिच्याकडे वाईट उद्देशाने पाहून, डोळ्याने अश्लील इशारे करीत होता. घडलेला प्रकार मुलीने आईला सांगितला. आईने आपल्या नातेवाईकांना घेऊन कांतराव शेकदार यांना समज देऊन प्रकरण थांबवले होते. त्यानंतर काही दिवस शेकदार यांनी काहीही केले नव्हते. परंतु दि. १७ मार्च रोजी सोमवारी पीडित मुलीची आई मोलमजुरीसाठी शेतावर गेली असता घरात आई नसल्याचे पाहून कांतराव शेकदार याने दुपारी एक वाजताच्या दरम्यान त्या मुलीच्या घराभोवती तीन-चार येरझारा मारीत मुलीकडे वाईट नजरेने पहात इशारे करीत होता. हा प्रकार मुलीच्या पंधरा वर्षीय भावाच्या लक्षात आल्याने त्याने कांतराव यास असे विचारणा केली असता, शेकदार याने त्यालाच शिवीगाळ केली. हा प्रकार त्याने आपल्या आईला सांगितल्याने मजुरीवरून परतलेल्या आईने आपल्या नातेवाईकांना घेऊन तामसा पोलीस ठाणे गाठून आरोपी कांतराव शेकदार यांचेविरुद्ध फिर्याद दिली.

दिलेल्या फिर्यादीनुसार तामसा पोलिसांनी आरोपी कांतराव शेकदार यांच्याविरुद्ध बाल लैंगिक अत्याचार संरक्षण कायद्यानुसार पॉस्कोअंतर्गत गुन्हा दाखल केला. तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून आरोपी कांतराव शेकदार यांला रातोरात बेड्या ठोकल्या. उपविभागीय पोलिस अधिकारी डॅनियल बेन यांनी या प्रकरणी रात्रीच भेट दिली. पुढील तपास फौजदार बालाजी नरोटे करीत आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत रविवारी पक्ष प्रवेश सोहळा

**तभा वृतसेवा**
**नायगांव, दि.१८ मार्च**



जिल्ह्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांना कमी कालावधीत आत्मिक उर्जा निर्माण करून देणारे नेते प्रताप पा.चिखलीकर हे भास्करराव पा.खतगांवकरांच्या नरसी येथील दि.२३ रोज मंगळवारी राष्ट्रवादी (अजित दादा पवार) गटातील पक्ष प्रवेश सोहळ्याच्या कार्यक्रमांच्या जय्यत तयारीची पाहणीसाठी आले असता दि.१७ रोज. मंगळवारी सकाळी. स्वर्गीय भगवानराव भिलवंडेच्या नरसी निवासस्थानी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते.पत्रकार परिषदेत प्रताप पा. चिखलीकर म्हणाले की राज्याच्या सत्तेतील भाजप,राष्ट्रवादी(अजित पवार गट)घटक पक्ष असुन. या दोन्ही पक्षांच्या समन्वयातूनच मी राष्ट्रवादी पक्षातून मी विधानसभा निवडणूक लढलो आहे.जरी विरोधक प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले तरी ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही दुसऱ्या पक्षातून निवडून येण्यासाठी दानत लागते असे. पत्रकार परिषदे वेळी मत व्यक्त केले आहे.

तद्नंतर जिल्ह्यातील राजकीय क्षेत्रातील ज्येष्ठ नेते माजी खासदार तथा माजी महसूलमंत्री भास्करराव खतगांवकर या वेळी म्हणाले की सध्या राज्याच्या सत्तेतील राष्ट्रवादी पक्ष(अजित पवार गट)हा एक भागीदार आहे आणि हा पक्ष सर्व सामान्यांच्या हितावह असुन सध्या जिल्ह्यामधील अनेक तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी पाण्याचे, निराधारांचे, लेंडी धरणातील पाणी या सारखे असंख्य प्रश्न प्रलंबित असून ह्या प्रश्ना बाबत राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजित पवार साहेबा सोबत सविस्तर चर्चा केली असता.दादानी मला पक्का विश्वास दाखविल्या मूळे तालुक्यातील नरसी हे ठिकाण हे बिलोली-देगलूर मधील मध्यवर्ती आसल्यामुळे दि.२३ मार्च रोज रविवारी नरसी येथे राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे नवाब मलिक, संपर्क मंत्री बाबासाहेब पाटील या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये पंधरा ते विस हजार जनसुमुदायांच्या उपस्थितीत मी व माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ.मिनल खतगांवकर, माजी आमदार अविनाश घाटे,माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा सह नायगांव,

बिलोली-देगलूर नगरसेवकांसह तालुक्यातील तिनसे ते चारसे सरपंच जवळपास हजार कार्यकर्त्यासह जाहीर पक्ष प्रवेश करण्याचा निर्धार केला आहे आसे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदे वेळी खतगांवकरांनी आपले मत व्यक्त केले आहे. या पत्रकार परिषदे वेळी माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा ,माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर, राजीवजी गंदीगुडे,वसंत सुगांवेसह खतगांवकर मित्र मंडळाचे असंख्य कार्यकर्ते पत्रकार मंडळी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### हडको येथे बुध्दगया येथील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलना निमित्त बैठक

**नवीन नांदेड-**हडको येथील रमाई बुद्ध विहार येथे दिनांक २५ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता घेण्यात आलेल्या समाजबांधवांच्या बैठकीत बुद्धगया येतील महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा येत्या २५ मार्च रोजी होणाऱ्या मोर्चाच्या अनुशंघाने रमाई बुद्ध विहार शाहुनगर, हडको येथे नांदेड दक्षिण परीसरात सर्व प्रथम भन्ते संघप्रिय यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक पार पडली. रमाई बुद्ध विहार शाहुनगर, हडको नवीन नांदेड येथे परिसरातील समाज बांधवांच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी दिनांक २५ मार्च मोर्चाच्या संदर्भात घ्यावयाच्या सुचना संदर्भात मान्यवरांनी मार्गदर्शन करताना महाबोधी विहार मुक्ती आंदोलनाद्वरे देशातले सर्व मंदिर आपल्या आपल्या धर्माचा लोकांचा ताब्यात आहे. परंतु बुद्धगया महाबोधी महाविहार हे बौद्धांचा विहार असले तरी त्याच्यावर ताबा इतर धर्मियांचा आहे.तेव्हा सदरील बुद्धगया येतील महाबोधी महाविहार यांचा ताबा बौद्धांचे धम्म गुरु पूज्य भंते यांच्याकडे देण्यात यावा या मागणीसाठी भारतातील सर्व बौद्ध समाजाने एकत्र लढा देण्यासाठी येणाऱ्या २५ मार्चला वाडी ,वस्ती, गाव,शहरातुन समाज बांधवांनी तन,मन,धनानी ताकतीनिशी मोर्चात सहभागी होण्याचा संदेश या बैठकीतून देण्यात आला. यावेळी या बैठकीचे प्रमुख मार्गदर्शक पूज्य बनते संघप्रिय यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन सम्राट आढाव व प्रदीप हानवते यांनी केले होते. या बैठकीचे प्रास्ताविक सम्राट आढाव यांनी केले. तर या बैठकीला मार्गदर्शन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते पी. एस. गवळे, बौद्धाचार्य सुजाता आढाव, अनिता भोळे, विलास गजभारे, राजू लांडगे, प्रसेनजीत वाघमारे, गौतम पवार, डि.के. कांबळे यांनी केले. तर सदरील बैठकीला समाज बांधव गोविंद कांबळे, आकाश सोनकांबळे, गोविंद राक्षसे, श्रेयस तायडे, आपीस हननवते ,संतोष आढाव, राजू गायकवाड, बंटी गायकवाड , अनिस टेळकीकर, निशांत सोनकांबळे, चिमु गवळे, रामजी सोनकांबळे, अनिकेत राक्षसमारे, मनोज कदम, धम्मा टोम्पे यांची उपस्थिती होती. सदरील उपस्थितांचे आभार प्रदीप हानवते यांनी मानले.

### डॉ.आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी जयभीम पाटील

**भोकर-**राष्ट्रनिर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती महोत्सवानिमित्त दि.१६ मार्च रोजी जेष्ट पत्रकार एल. ए. हिरे यांच्या



अध्यक्षतेखाली लुंबिनी बुध्द विहार म.फुले नगर भोकर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले या वेळी सर्वानुमते डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती घोषित करण्यात आली ती खालील प्रमाणे अध्यक्ष जयभीम पाटील,उपाध्यक्ष कपिल कांबळे,सचिव सम्राट हिरे,कोषाध्यक्ष साहेबराव मोरे,सहसचिव देवा हाटकर,संघटक सुभाष तेल,सिध्दार्थ जाधव,गौतम कसबे,विक्रम क्षिरसागर, सदस्य मनोज शिंदे, प्रशांत हानमंते, संतोष डोंगरे, बाबुराव गाडेकर, सतिष जाधव,प्रितम डोंगरे, बाळा कदम, वैभव धुतुरे, जितेंद्र कोकाटे ,सल्लागार जेष्ट पत्रकार एल.ए.हिरे, भिमराव दुधारे, नामदेव वाघमारे, पि.पी.हानवते, सुरेश कावळे, डॉ मनोज गिमेकर, विजय कावळे, राजु दांडगे,अविनाश गायकवाड, कांतीलाल जोंधळे, दलित डोंगरे ढोले,एस.आर.जोंधळे,यु.एन.ऐडके,दत्ता डोंगरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे यावेळी रमेश गायकवाड,अशोक डोंगरे , धम्मा कदम ,संदीप गायकवाड , छोटु सोनकांबळे , माधव कांबळे ,कैलास दांडगे,त्रिरत्न कावळे, संघदिप वारघडे,सुनिल दुधारे करण कांबळे मिलींद दुधारे ,मयुर ढोले,मनोज सोनकांबळे आदिंची मोठया संख्येने उपस्थिती होती.

# शेतातील घराला आग लागून चार लाखाचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि.१८ मार्च**



तामसा येथून जवळच असलेल्या पांगरी ( ता.) येथील शेतातील घराला घराला अचानक आग लागून घरातील व संसार उपयोगी साहित्य, शेतीची अवजारे, दुधाळ म्हैस व एक वगारू दगावल्याने सुमारे चार लाखाचे नुकसान झाल्याची घटना दिनांक १६ रोजी दुपारी अकरा वाजताच्या दरम्यान पांगरी शिवारात घडली आहे. आगीचे नेमके कारण समजू शकले नाही.

हदगाव तालुक्यातील पांगरी येथील मल्लू पुरभाजी बदरवाड यांचे कुटुंब पांगरी शिवारातील शेत गट क्र. ८६ मध्ये टीन शेडच्या घरात राहत होते. मल्लू बदरवाड हे आपल्या कुटुंबियासह रविवारी शेतातील हळद काढणीच्या कामात व्यस्त होते. त्यावेळी त्यांच्या टिन शेडच्या घराला अचानक आग लागली. घरातून आगीचे गोळे बाहेर येत असल्याचे पाहून सर्वकुटुंबीय घाबरून गेले. धावतपळत येऊन त्यांनी घरातील आखाड्यात बांधलेले सर्व जनावरे दावे तोडून बाहेर काढली. पण घराबाहेर बांधलेली एक दुधाळ म्हैस व दोन वघारू आगीचे गोळे अंगावर पडून चांगलीच भाजली होती. आग एवढी भयानक होती की, आग आटोक्यात आणण्यासाठी कोणालाही जवळ येऊ देत नव्हती. खूप आरडाओरड केल्यानंतर शेजारीपाजारी, गावकरी धाऊन आले. मात्र अगीपुढे कोणाचाही पर्याय चालत नव्हता. शेवटी सौर ऊर्जेच्या पंपाद्वारे पाणी उपलब्ध करून आग आटोक्यात आणली गेली. मात्र घरात वर्षभरासाठी साठवून ठेवलेले संसार उपयोगी साहित्य गहू, हरभरा, ज्वारी, दाळ, तांदूळ, टिव्ही,पलंग,भांडे, कपडे, शेती उपयोगी साहित्य, तुषार संच, ठिबक संच, पत्रे, लाकडे आगीत भस्मसात झाले. घडलेल्या घटनेची माहिती महसूल विभागाला देण्यात आली होती. तामसा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी संजय वानोळे यांनी सोमवारी घटनास्थळी जाऊन आगीचा पंचनामा केला. आगीत घरासमोर बांधलेली एक म्हैस, दोन वगारू भाजल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांचेवर उपचार सुरू होते. परंतु उपचारादरम्यान त्यातील एक म्हैस व एक वगारु मंगळवारी दगावले. त्याचाही पंचनामा करण्यात आला. झालेल्या नुकसानीतून सदर शेतकऱ्याचा संपूर्ण संसार उघड्यावर आला असून त्या शेतकऱ्याला प्रशासनाने तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी पुढे आली आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्या कंधार तालुकाध्यक्षपदी राजु गायकवाड



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१८ मार्च**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमच्या कंधार तालुकाध्यक्षपदी राजु गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

फोरमचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नितीन राऊत यांच्या आदेशाने ही निवड करण्यात आली असून जिल्हाध्यक्ष संतोष कांबळे यांनी त्यांना नियुक्ती पत्र प्रदान केले. फोरमच्या कंधार तालुकाध्यक्षपदी नियुक्ती झाल्या बद्दल राजु गायकवाड यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे. दरम्यान दि. ३ मार्च रोजी कंधार तालुक्यातील मंगणाळी येथे मारहाणीची घटना घडली होती. या घटनेप्रकरणी ऑट्रोसिटी अंतर्गत राजू गायवाड यांनी गुन्हा दाखल केला होता. हा गुन्हा दाखल केल्यानंतर राजु गायकवाड यांना सातत्याने धमक्या येत असल्यामुळे डॉ. आंबेडकर सोशल फोरमने त्यांना नियुक्ती करून पाठबळ दिले असून त्यांच्या या नियुक्तीमुळे डॉ. आंबेडकर सोशल फोरमला बळकटी मिळणार असल्याचेही नांदेड जिल्हाध्यक्ष संतोष कांबळे म्हणाले.

# महाबोधी महाविहार बुद्धगया मुक्ती आंदोलन महामोर्चा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१८ मार्च**

बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले विहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी नांदेड येथे येत्या २५ मार्च रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय-सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केलेले आहे.. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली वर्षांनवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापनावर ताबा घेऊन मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल क्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. त्यामुळे सदर कायदा तत्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी भारतभर बौद्ध भिक्खू आणि अनुयायींनी व्यापक आंदोलन छेडले आहे. बुद्धविहार मुक्ती आंदोलनाच्या समर्थनार्थ नांदेड जिल्ह्यात मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. नांदेडच्या कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान नवीन मोंढा नांदेड येथे दुपारी १२ वाजता जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायींचा जमाव जमणार आहे. नवा मोंढा मैदान येथून महामोर्चाची सुरुवात होणार असून नियोजित भगवान बुद्ध पुतळा, महात्मा फुले पुतळा, शिवाजीनगर, कलामंदिर, वजीराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नांदेड जिल्हाधिकारी कार्यालय असा महामोर्चाचा मार्ग राहणार आहे. महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पोहोचल्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे.

# गोरठेकर घराण्यातील छाव्यांनी छावा चित्रपटा प्रमाणे संस्कृती जपून जनसेवा करावे : सदाशिव पुपुलवाड

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि.१८ मार्च**



गोरठेकर घराणे म्हणजे महाराष्ट्रात राजकीय नावाजलेले घराणे आहेत या घराण्यात राजकीय तिसरी पिडी सक्रिय झाली असून गोरठेकर घराण्यातील छावानी अजोबा, वडिल यांची राजकीय कारकीर्द व संस्कृतीला जपून जनतेला न्याय देण्याचे कार्य करावे असेही राष्ट्रवादी जिल्हा प्रवक्ते शरद पवार गटाचे सदाशिव पुपुलवाड यांनी सिंधी येथे छावा चित्रपट प्रदर्शित होण्या अगोदर बोलत होते.

आमदार पुत्र कैलास देशमुख गोरठेकर यांच्या वाढदिवसा निमित्त उमरी, धर्माबाद, नायगाव, भोकर तालुक्यात विविध गावात गोरठेकर चाहत्यांनी मोठ्या ठिक ठिकाणी मोठ्या प्रमाणात बॅनर बाजी करण्यात आणि तर मुख्य म्हणजे कांही बॅनरवर KD Boss (केडी बॉस) असे संबोधीत करण्यात आले मोठ्या प्रमाणात वाढदिवस साजरा करण्यात आला मागील काळात कोरोना आणि वडिलाचे निधंन झाल्याने गोरठेकर घराण्यात वाढदिवस साध्या पद्धतीते साजरा करण्यात आला पण १६ मार्च २०२५ चा कैलास भाऊ गोरठेकर यांच्या रेकॉर्ड ब्रेक वाढदिवस चाहत्यांनी साजरा करून शुभेच्छाचा वर्षाव केला आहे.

सदाशिव पुपुलवाड पुढे म्हणाले कै स्व . माजी आमदार बाबासाहेब देशमुख गोरठेकर, कै स्व. बापूसाहेब देशमुख गोरठेकर यांच्यातील गुणाचा करारी बाणा हा या कैलास देशमुख गोरठेकर व शिरीषभाऊ गोरठेकर यांच्यात दिसून येत आहे म्हणून आज ही तिसऱ्या पिडीवर जनता तेवढीच मानत आहेआणि प्रेम करितआहे हे म्हणजे दिलेला शब्द, योग्य न्याय देणे हे गोरठेकर घराण्याची ओळख व ख्याती आहे या राजकीय कारकीर्दीत वंश परंमपराची राजनैतीक वारसा जतन केला तरी पुरेशा आहे . तुम्ही यापुढे कांही केल नाही तरी चालेल पण अजोबा, वडिलाच्या पाऊलावर पाऊल ठेवून चालला तर जनता येणाऱ्या काळात तुम्हाला विसरणार नाही असे सल्ला सदाशिव पुपुलवाड यांनी तालुक्यातील शिंधी येथे कैलास भाऊ यांच्या अभिष्टचिंतन सोहळात बोलून कैलासभाऊ देशमुख गोरठेकर यांचे कौतूक करून पुढील राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

कैलास भाऊ गोरठेकर यांनी ही म्हणाले माझा अनेक ठिकाणी वाढदिवस साजरा झाला सिंधी येथिल गावातील सत्कार माझा स्मरणीय आहे. गोरठेकर घराण्यानी शब्द दिला तो आज पर्यंत पाळला आहे यापुढे जनतेला दिलेला शब्द आम्ही दोघे बंधू पाळणार असून आमच्यात गदारी नाही अन्याला तोडीस तोड देणारे मानस आहोत जनता म्हणजे माझ कुंटुब आहे या गोरठेकर घराण्यावर प्रेम करणाऱ्या जनतेला गोरठेकर घराने विसणार नाही की विश्वासाला तडा जावू देणार नाही कारण माझ्यावर झालेला राजकीय अन्यायवरचा विजय म्हणजे जनतेचा आशीर्वाद आहे असे बोलून गोरठेकर येणाऱ्या भावी निवडणूकीचा गर्भीत इशारा दिला आहे.

# बदलत्या सामाजिक समस्या समजून घेणे आवश्यक : राम तरटे



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.१८ मार्च**

समाज आणि देश मोठ्या प्रमाणात बदलतो आहे. विकासाच्या नव्या वाटेवरती आपण वाटचाल करत आहोत. एकीकडे समाज आणि देश बदलतो आहे तर दुसरीकडे सामाजिक समस्याही तितक्याच मोठ्या प्रमाणात बदलत आहेत. त्यामुळे या बदलत्या सामाजिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत प्रसिद्ध कथाकार तथा पत्रकार राम तरटे यांनी व्यक्त केले.

स्वामीरामानंदतीर्थमराठवाडा विद्यापीठातील सामाजिक शास्त्र संकुलात जागतिक समाजकार्य दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'मी कसा घडलो' या उपक्रमात ते बोलत होते. यावेळी सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक डॉ. घनश्याम येळणे, डॉ. नितीन गायकवाड, डॉ. स्मिता नायर, प्रा. ओमकार मठपती यांची उपस्थिती होती.

यावेळी राम तरटे आणि विद्यार्थ्यांशी हितगुज करताना आपण कसे घडलो. त्यासाठी काय-काय संघर्ष करावा लागला. कसे कष्ट, परिश्रम घ्यावे लागले हे अगदी सहज आणि सोप्या भाषेत सांगितले. कितीही संकट आली, संघर्ष करावा लागला तरी नैराश्यात न जाता त्या संकटातून नवीन मार्ग शोधून काढता आला पाहिजेत. संकट काळात ज्यांना योग्य मार्ग निवडता आला, स्वतःवरचा संयम कायम राखता आला. अशी माणसे निश्चितपणे यशस्वी होतात. हा माझाही अनुभव असल्याचे सांगतानाच समाजकार्यात येणाऱ्या प्रत्येकाने आपल्या कुटुंबापासून समाजकार्याची सुरुवात करावी. आई-वडिलांचा मान सन्मान राखतानाच त्यांना आपल्यापासून अलिप्त ठेवू नये. कारण आपण आपल्या आई-वडिलांना अलिप्त ठेवून सामाजिक कार्य करायला लागलो तर त्या कार्याला अर्थ उरत नाही. आपण समाजात ज्या पद्धतीने वर्तन करत असतो त्या पद्धतीने समाज आपल्याकडे बघत असतो, किंबहुना कधी-कधी आपल्या वर्तनाचे समाजातील इतर घटक अनुकरण करत असतात. या अनुकरणाचा परिणाम सामाजिक स्वास्थ्यावर होत असतो. त्यामुळे प्रत्येकाने समाज कार्य करत असताना त्या कार्याची सुरुवात आपल्या कुटुंबाच्या सामाजिक प्रतिष्ठेपासून करावी असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. स्मिता नायर यांनी केले. यावेळी मा. व्यवस्थापण परिषद सदस्य डॉ. हणमंत कंधारकर यांनी मा. कुलगुरू यांच्या संकल्पनेचे स्वागत केले आणि आपली भूमिका मांडली. सूत्रसंचालन आविनाश चिंतले यांनी केले तर आभार डॉ. नितीन गायकवाड यांनी मांडले.

# पद नसतानाही आनंद मच्छेवार यांची जनसेवेची धडपड कायम

## उन्हाळा व पवित्र रमजान महिन्यात पाणीपुरवठ्यासाठी केला प्रशासनासी संघर्ष

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.१८ मार्च**

पदावर नसतानाही किनवट शहरातील समस्या सोडविण्यासाठी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांची धडपड सुरु असून सध्या उन्हाळ्याचे दिवस व त्यात पवित्र रमजान महिन्यात नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी हेळसांड लक्षात घेऊन त्यांनी थकबाकीमुळे खंडित झालेला नागझरी प्रकल्पचा पाणी पुरवठा सुरु केल्याने मुस्लिम बांधवासह नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.



मागील सुमारे २ वर्षांपासून किनवट नगरपरिषदेवर प्रशासक राज असल्याने शहरातील नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. प्रशासकराजमुळे कर्मचाऱ्यावर कोणाचेही नियंत्रण राहिले नाही. परिणामी पाणीटंचाई, स्वछता, तसेच विकासकामे ठप्प पडली असून सामान्यनागरिकांची कामे वेळेत होणे दुरापास्त बनले आहे.दरम्यान शहरवासियांच्या परिणामी शहरातील सामान्य नागरिकांची हेळसांड होत आहे. दरम्यान दिवसेंदिवस शहराच्या समस्यात वाढ होत असल्याची बाब लक्षात घेऊन आ. भीमराव केराम यांच्या मार्गदर्शनाखाली मागील ५ वर्ष नगराध्यक्षपदाची जबाबदारी उत्तमपणे सांभाळलेले व सर्वच जातीसमुहात आपल्या विकासकार्याची छाप निर्माण केलेले आनंद मच्छेवार यांनी पद नसतानाही नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तळमळीने पुढाकार घेतला आहे. कडक उन्हाळा आणि त्यात मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना सुरु असताना अनेक प्रभागात पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली असून यासंदर्भात माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी लघुपाटबंधारे विभागाकडे पाठपुरावा करून थकबाकीमुळे खंडित असलेला शहराचा नागझरी प्रकल्पचा पाणीपुरवठा सुरु करून दिल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहेत.या व्यतिरिक्त सार्वजनिक मूलभूत गरजा तसेच नागरिकांच्या वैयक्तिक अनुदानाच्या रखडलेल्या योजना मार्गी लावण्याच्या दृष्टीने ते जनतेसी संपर्क साधत असून घरकुलांची बिले व विविध शासकीय प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी निस्वार्थ भावनेने व तळमळीने कार्य करत असल्याने गोरगरीब व सर्व सामान्य नागरिकाकडून त्यांचे आभार व्यक्त केले जात आहे.

> नगराध्यक्ष पदाच्या काळात किनवट शहरातील जनतेने मला भरभरून प्रेम दिले विकासकामाच्या माध्यमातून मी माझे कर्तव्य नेटाने पार पाडले. आज मी नगराध्यक्ष पदावर नसलो तरी एक कार्यकर्ता म्हणून सर्वसामान्य व गोरगरीब जनतेची कामे करण्यास मी कटिबद्ध आहे.किनवटचे विकासाभीमुख आमदार भीमराव केराम यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या अडीअडचणी व समस्या सोडविण्यास बांधील आहोत. अशा प्रतिक्रिया माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी दैनिक तरुण भारतसी बोलताना दिल्या आहेत.